# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०६.०८.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक ०६ ऑगस्ट २०१८ रोजी (का.प.क्र.१८) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ३.०० वा.वंदेमातरम या गीताने सुरू झाली. सभेला मा.अति. आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १४. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| १८. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १९. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २०. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २१. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २२. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २३. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २४. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २५. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २६. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| २७. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| २८. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| २९. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३०. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३१. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |

| | |
|---|---|
| ३२. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३३. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३४. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३५. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ३६. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ३७. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ३८. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ३९. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४०. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ४१. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४२. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४३. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४४. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४५. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४६. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४७. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४८. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ४९. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५०. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५१. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ५२. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५३. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५४. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५५. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५६. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ५७. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ५८. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ५९. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६०. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६१. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६२. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६३. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ६४. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ६५. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ६६. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ६७. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ६८. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ६९. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७०. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |

| | |
|---|---|
| ७१. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७२. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७३. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७४. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७५. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७६. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ७७. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ७८. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ७९. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८०. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८१. | स.स. श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८२. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८३. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८४. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम ६२६

मा.महापौर :हि सभा एका तासामध्ये संपविण्यात येईल. नंतर पुन्हा पुर्वीची सभा जी की, समांतर जलवाहिनी संदर्भात आहे. जो प्रलंबीत विषय आहे तो घ्यायचा आहे.

(सभेच्या कामकाजात हा विषय शेवटी घेण्यात आलेला होता.)

**विषय क्रमांक ५७८:-** **(नगर सचिव विभाग)**

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) (सुधारणा) नियम-२०१२ चे नियम ४,५ व ७ अन्वये निर्वाचित पालिका सदस्यांव्यतिरीक्त मान्यता प्राप्त, नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या शिफारशी वरून नियम ५(२) च्या तरतुदी प्रमाणे रिक्त झालेल्या एका नामनिर्देशित सदस्याच्या जागेवर एका नामनिर्देशित पालिका सदस्याचे नामनिर्देशन करणे.

मा.महापौर :एका नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करावयाची आहे. त्याचा प्रस्ताव मा.आयुक्त यांनी ठेवला आहे. बंद पॉकीट आलेले आहे.

श्री.प्रमोद राठोड :निवृत्त झालेले सदस्यांच्या जागी हे स्विकृत सदस्य घेत आहोत. कोणत्या नियमानुसार घेत आहोत? वाचन व्हावे. कारण या संदर्भात मागे मा.उच्च न्यायालयात एक याचिका झाली होती. त्यावेळी मा.आयुक्त, श्री.महाजन साहेब होते. त्यावेळेस स्विकृत सदस्य घेतले होते. त्यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञ घेतले होते. जे की, बीपीएमसी ॲक्ट मध्ये नियम **क** पासून **छ** पर्यत जे दिले. त्यानुसार घेतले पाहिजे. त्यांना घ्यावे. अशी नियमावली आहे. जे सदस्य निवृत्त झाले ते कोणत्या कॅटॅगिरीमध्ये होते? आता नवीन जे घेणार आहोत ते कुठल्या कॅटॅगिरी मधील आहे? अपेक्षित असे की, वेगवेगळ्या कॅटॅगिरीतील एक व्यक्ती स्विकृत सदस्य असावे.

नगर सचिव :जे सदस्य निवृत्त झाले. ते नियमावली मधील **ड** मध्ये जे नमूद आहे. त्या कॅटॅगिरीमधील जे की, राज्यात कमीत कमी पाच वर्षाकरीता अभिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्यामधील पदवीधारक व राज्यात विधीक्षेत्रात

काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षाचा अनुभव असलेली असेल. निवृत्त झालेले सदस्य या अर्हतेचे आहेत.

श्री.प्रमोद राठोड :मग अपेक्षीत काय होते? कुठल्या कॅटॅगिरीमधील नियुक्त करायला पाहिजे होते? मा.उच्च न्यायालयात यादी दिली होती. वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ञ जे घेतलेले आहेत त्यावेळी सांगितले होते की, हे आम्हाला अपेक्षीत नव्हते. पुढच्या वेळेस जे नियुक्त करू ते वेगवेगळ्या कॅटॅगिरीतील घेऊ. नियम **ड** मधील निवृत्त झाले तर त्यातील घेतले का?

नगर सचिव :पेज नंबर-६७८ मध्ये नामनिर्देर्शित सदस्यांच्या नियुक्ती मध्ये क्रमांक २ वर मा.आयुक्तांनी केलेल्या शिफारशीचा विचार करून महानगरपालिका पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करील. परंतु मा.आयुक्तांनी अशा प्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तीची शिफारस महानगरपालिकेने अमान्य करावयाची ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील.

श्री.राजेंद्र जंजाळ :या नावाची मा.आयुक्तांनी शिफारस केली का?

श्री.भगवान घडमोडे :ज्या कॅटॅगिरीमधील सदस्य निवृत्त झाले, त्या कॅटॅगिरीतील उमेदवाराचा प्रस्ताव आलेला आहे का?

मा.महापौर :दोन बंद पाकीट आलेली आहेत, तुम्ही म्हणत असाल तर सिल करून ठेवतो.

श्री.नासेर सिद्दीकी :छाननीमध्ये सर्व काही कार्यवाही केलेली आहे.

श्री.भगवान घडमोडे :आमचा प्रक्रियेला विरोध नाही. परंतु प्रकरण मा.कोर्टात असल्यामूळे अडचण येऊ नये.

मा.महापौर :यात कोणाच्या नावाची शिफारस आहे? कोणत्या पक्षाचे आहे? हे सर्व सील आहे. हे उघडल्यानंतर समोर येईल. सभागृहाने परवानगी दिली तर पाकीट उघडतो नाही तर परत पाकीट सिल करून मा.आयुक्तांकडे ठेवतो. सभागृह जे म्हणेल ते सभागृहाचे मत व्यक्त व्हायला पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे :विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा.

श्री.प्रमोद राठोड :विषय आज आला म्हणून बोलतो. विचारणा केली असता **छ** कॅटॅगिरीमधील घेतले असे सांगितले. जे काही स्विकृत सदस्य आहेत ते कोणकोणत्या कॅटॅगिरी तील आहे?

नगर सचिव :आता पर्यत हे सदस्य आहे ते **छ** नुसार आहे. ज्यानी राजीनामा दिला ते **ड** मधील आहे. परंतु आणखी असे की नियम ४ मधील **क** ते **छ** मधील अर्हता असणाऱ्या प्रत्येकी एका व्यक्तीची पालिका सदस्य म्हणून नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

श्री.प्रमोद राठोड :प्रयत्न करण्यात यावे असे आहे. परंतु मागच्या वेळेस मा.उच्च न्यायालयात प्रकरण गेले होते. विधी सल्लागार यांचेकडून खुलासा घ्यावा. त्यावेळेस काय मत नोंदविलेले होते?

श्री.नासेर सिद्दीकी :पुर्ण प्रोसेस झालेली आहे. मा.आयुक्तांना विनंती करावी. हे पाकीट ओपन करावे. तेव्हा कळेल की काय आहे? अभ्यास करून ही कार्यवाही केली असेल. सचिव यांनी खुलासा केलेला आहे.

श्री.प्रमोद राठोड :**ड** कॅटॅगिरीमधील निवृत्त झाले असेल तर त्याच कॅटॅगिरीमधील सदस्य भरण्यात यावे. गटनेता शिफारस करतात. नियुक्ती करीत नाही. मा.आयुक्त हे सर्व छाननी करून सर्वसाधारण सभेला शिफारस करतात की, हे वेगवेगळ्या

क्षेत्रातील तज्ञ आहे. नियमात हे बसते व त्यानुसार शिफारस करतात. ती शिफारस होत असतांना ही कॅटॅगिरीचे चेक करणे गरजेचे होते. जे शिफारस केले ते **छ** कॅटॅगिरीमधील आहे. जे निवृत्त झाले ते **ड** कॅटीगिरीमधील होते. ते निवृत्त न्यायाधीश होते त्यांना विधी क्षेत्राचा पाच वर्ष अनुभव होता. **ड** कॅटॅगिरीचा निवृत्त होतो तर **छ** कॅटीगिरीतला कसा भरतो आहे? हे नियम कुणी बनवले?

श्री.नासेर सिद्दीकी :सचिव यांनी आताच म्हटले की, असे होऊ शकते, करू शकतो.

श्री.प्रमोद राठोड :तौलनिक संख्या बळानुसार शिफारस केलेली असते. मा.आयुक्तांनी नाव दिले असेल पक्षासह दिले नसेल. येथे पक्ष येत नाही.

श्री.नासेर सिद्दीकी :पक्षातर्फे नाव शिफारस करीत असतात.

श्री.प्रमोद राठोड :तज्ञ जेव्हा घेतले जाते त्यांची कॅटॅगिरी का दिलेल्या आहेत **त्यांनी**?

श्री.भगवान घडमोडे :ज्या पक्षाचे तौलनिक संख्याबळ असेल त्यानुसार शिफारस करू शकतात. परंतु कॅटॅगिरीचा प्रश्न आहे.

श्री.नासेर सिद्दीकी :नगर सचिव यांनी सांगितले हे होऊ शकते यात हे बसू शकतात.

नगरसचिव :दोन्ही अर्ज **छ** मध्ये आलेले आहे.

श्री.प्रमोद राठोड :**ड** कॅटॅगिरीचा असेल तर घ्यावे **छ** कॅटॅगिरीचा असेल तर घेऊ नये .

नगरसचिव :परंतु मा.आयुक्तांनी अशा प्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तीची शिफारस महानगरपालिकेने अमान्य करावयाची ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील.

मा.महापौर :अमान्य करण्याची पण तरतूद आहे. सभागृहाने सांगावे पाकीट उघडायचे की नाही?

श्री.प्रमोद राठोड :**ड** कॅटॅगिरी असेल तर मान्य करावे.

मा.महापौर :पुन्हा हे पाकीट मा.आयुक्ताकडे फेर तपासणीसाठी देण्यात येते व पुढील सभेत सादर करावे.

श्री.नासेर सिद्दीकी :नियम **ड** व **छ** मध्ये काय आहे? सर्व प्रोसेस झालेली आहे. सचिव यांनी म्हटले की, हे होऊ शकते. तर अडचण काय आहे?

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या प्रस्तावाच्या संदर्भात मा.आयुक्त यांनी फेर तपासणी करून त्या बाबतचा अहवाल पुढील सभेत सादर करण्यास मान्यता देण्यात येते.

श्री.राजगौरव वानखेडे :सिडको-हडको भागात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. ७-८ व्या दिवशी पाणी दिले जात आहे. आज पाणी येणार होते आले नाही. काही भागात २ दिवसाआड पाणी येत आहे. असा दुजाभाव का होतो आहे?

मा.महापौर :पाणी पुरवठा अधिकारी यांनी शहरात योग्य त्या प्रमाणात पाणी देणे बाबत नियोजन करावे.

**विषय क्रमांक ५७९:-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्री.गजानन बारवाल :किती लोकांनी मागणी केली व किती लोकांना शौचालय दिले आहे? शासनाचे अनुदान मिळत नाही म्हणुन शौचालय देत नाही असे सांगतात.

कार्य.अभियंता :७४९७ लाभार्थींची निवड केली, पैकी ७२६३ लोकांना रु.६ हजार प्रमाणे पहिला हफ्ता दिला. सहा महिन्यापासून शासनाकडून अनुदान आले नाही.

श्रीमती संगिता वाघुले :अजुनपर्यंत शौचालयाला हफ्ता मिळाला नाही. यादी आहे सर्व माहिती समोर आहे.

मा.महापौर :शासनाकडून अनुदान येईपर्यंत महापालिकेच्या फंडातून करण्याचे ठरविले होते. शासनाचे अनुदान येईल तेव्हा येईल ते आल्यानंतर ते मनपा फंडात टाकावे.

कार्य.अभि. :सभेत निर्णय झाल्यानुसार बजेट मध्ये ठेवले आहे. बजेट अंतिम झाले की, कार्यवाही केली जाईल. रु.३.०० कोटीची तरतूद ठेवली आहे.

मा.महापौर :बजेट बूकमध्ये येणे औपचारीकता आहे. काम सुरू करावे.

श्री.गोकुळसिंग मलके :मा.पंतप्रधान यांनी ही योजना सुरू केली. माझे वार्डातील शौचालयाचे काम होत नाही. त्या लोकांना पहिल्या हफ्त्याची रक्कम दिली जात नाही. ७ महिन्यापासून चर्चा करतो. कार्यवाही नाही. हा विषय मंजूर करू नये.

श्री.भगवान घडमोडे :अनेक समस्या आहेत. काय अडचणी आहे? हे सांगत नाही. योजना यशस्वी झाली पाहिजे.

श्री.राजू शिंदे :नावा पुरता ठराव ठेवतो. काम होत नाही. प्रोग्रेस काही नाही. बाहेर शौचालयास जातात म्हणुन काहींवर गुन्हे दाखल केले. काही ठिकाणी ढापे टाकलेले नाहीत, भांडे बसविले नाही. काहींना अनुदान दिले नाही. मनपाच्या बजेट मधून खर्च करावे. योजना पुर्ण करावी. काहीना शौचालय न देता रु.१२ हजार घेतले म्हणून गुन्हे दाखल केले गेले. ते तपासण्याची गरज आहे.

कार्य.अभियता :हे काम वार्ड अधिकारी, वार्ड अभियंता करतात. माझे कन्ट्रोलिंग यासाठी आहे की, फक्त रक्कम वाटप करणे बाबत.

मा.महापौर :चांगली योजना आहे. गोर-गरीबांसाठी लाभ मिळावा. अर्धवट कामे ठेवू नये. योजना पुर्ण करायची असेल तर दुर्लक्ष होऊ नये, होत नसेल तर शासनाकडे परत पाठवा. मनपाच्या फंडातून काम करावे. मुख्य लेखाधिकारी यांनी यात लक्ष द्यावे. बजेट नुसार रक्कम या कामासाठी देता येईल. दोन दिवसात कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.खासदार श्री.राजकुमार धुत यांनी आरटीओ कार्यालय व मुकूदंवाडी येथे ग्रीनबेल्ट मध्ये सार्वजनिक शौचालय देणार आहे. मुकूंदवाडी भागात कूठे करणार आहे? ग्रीन बेल्टमध्ये सार्वजनिक शौचालय करता येते का?

कार्य.अभियंता :मा.खासदार यांची सुचना होती. मुकूंदवाडी हे एमएसआरडीसी यांचे कॉरीडोर मध्ये येत असल्यामूळे त्यांनी एनओसी दिली नाही. बसस्टॉप समोर जागा होती.

मा.महापौर :हा महत्वाचा विषय आहे. शौचालयाचे कामे हाती घ्यावी काम तातडीने करावे. सदस्यांनी सुचना केल्या. त्याची अंमलबजावणी करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८०:-** **(कार्यकारी अभियंता पा.पु.)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरास १२१९ मीमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनी द्वारे पाणी पुरवठा होतो. सदर जलवाहीनी जायकवाडी ते फारोळा जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत रस्त्याच्या

बाजूने टाकण्यात आलेली आहे. भविष्यामध्ये औरंगाबाद पैठण राज्य रस्ता क्र.३० चे रुंदीकरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात येत आहे. संबंधीत विभागाने औरंगाबाद ते पैठणकडे जातांना राज्य रस्ता क्र.३० च्या उजव्या बाजुला बिडकीनपुढे हॉटेल आनंद रेस्टॉरंट समोर १२१९ मीमी व्यासाची मुख्य पोलादी अशुध्द जलवाहीनी भविष्यात रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होत असल्यामुळे १६० मी.लांबीचा पुरवठा गृहीत धरुन एकत्रित रु.४८,६३,१००/- किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. या प्रस्तावाला दि.१९.०७.२०१७ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेने ठराव क्र.४५ नुसार मान्यता घेऊन निविदा कार्यवाही करण्यात आली. सर्व प्रक्रिया पार पाडून प्राप्त झालेली निविदा नुर कन्स्ट्रक्शन यांची स्थायी समिती ठराव क्र.२४.०१.२०१८ विषय क्र.२४९ अन्वये मान्यता घेऊन नुर कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात आले. प्रत्यक्षात काम करत असतांना ३२० मीटर लांबीचे पाईप बाधीत होत असल्याचे दिसून आले. १६० मीटर लांबीचे पाईप खात्यामार्फत पुरवठा करून एकूण ३२० मीटर पाईप अंथरण्याचे काम केल्यास कामाचे जास्तीचे परिमाण (Excess Quantity) प्रत्यक्ष कामानुसार मंजुर निविदा दराने कंत्राटदाराला अदा करावे लागेल. यासाठी लागणाऱ्या रु.१५,२६,७८६/- खर्चाच्या अंदाजपत्रकास देखील सक्षम मान्यता घेतली आहे.

वरील बाबीमुळे मुळ अंदाजपत्रकामध्ये खालील प्रमाणे वाढ झालेली आहे.

| | |
|---|---|
| १. स्विकृत निविदा रक्कम | - रुपये ५९,२८,२९२/- (२८% जास्त दराने) |
| २. अतिरीक्त बाब रक्कम | - रुपये ५,३८,२४५/- |
| ३. वाढीव परिमाणासाठी लागणारा खर्च रक्कम | - रुपये १५,२६,७८५/- |
| ४. एकूण अपेक्षित खर्च (१+२+३) | - रुपये ७९,९३,३२२/- |

करीता, र.रु.७९,९३,३२२/-चे सुधारित अंदाजपत्रक व प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**चर्चा:-**

| | |
|---|---|
| मा.महापौर | :नेमका विषय काय आहे? याची माहिति द्यावी. |
| कार्य.अभि.(श्री.कोल्हे) | :पैठण रस्त्याचे काम चालू असून त्यामध्ये महापालिकेची पाणीपुरवठा लाईन येते ती हटवून रस्त्याच्या कडेला टाकावी. अशी मागणी पीडब्ल्युडी विभागामार्फत करण्यात आली. |
| मा.महापौर | :२८ टक्के जास्त दराची मुळ निविदा आहे. मुळ काम रु.५९.२८ लक्षचे होते वाढीव काम रु.१५.२६ लक्षचे आहे. तर मुळ काम किती झालेले आहे? |
| कार्य.अभियंता | :मुळ काम १६० मीटरचे झालेले आहे. |
| श्री.अजीम अहेमद | :एक समिती गठण केली आहे. त्या समितीची मान्यता घेतली का? आजही ४० संचिका परत आल्या जे की, ४ टक्केने वाढीव होत्या. यात २८ टक्केने वाढीव का देत आहे? |
| मा.महापौर | :यात वाढीव कामाचा खर्च आहे. तो विषय वेगळा आहे. प्रलंबीत संचिकांचा स्थायी समिती निर्णय घेईल. |
| श्री.अजीम अहेमद | :हा विषय स्थगित करावा स्थायी समिती निर्णय घेईल. तेव्हा त्या बरोबर हा विषय घ्यावा. |
| श्री.राजू शिंदे | :१६० मी.लाईन खाली घेण्याची निविदा दि.१७.७.२०१७ काढली होती. दिनांक २४.०१.२०१८ रोजी कार्यादेश दिला. त्यांना काम करण्याचा कालावधी ४ महिन्याचा दिला होता. तो संपलेला आहे. |

कार्य.अभियंता :त्यांचे डिमार्केशन मिळाले नव्हते म्हणून काम लांबले होते. त्यांच्या मागणी प्रमाणे अंदाजपत्रक झाले. निविदा प्रक्रिया झाली. काम प्रत्यक्ष करतांना उशीर झाला.

श्री.राजू शिंदे :विना डि-मार्केशन शिवाय निविदा काढतो का? असे असेल तर योग्य नाही. महापालिका आर्थीक संकटात आहे हे सांगायची कुणाला गरज नाही. असे असतांना असे बोगस ठराव आणून महापालिकेला भुर्दंड पोहचवितो आणि नको तेथे पैसा खर्च करतो. माझे माहिती प्रमाणे ९ ठिकाणी लाईन खाली घ्यायची आहे. मग हे एकच काम करण्याचे कारण काय?

कार्य.अभियंता :सार्वजनिक बांधकाम विभागाचे एवढ्या कामापुरतेच पत्र आलेले आहे.

श्री.राजू शिंदे :एकूण ९ ठिकाणी पाईप लाईन खाली घ्यायची आहे. हे काम पीडब्ल्यूडीचे आहे. त्यांनी पुर्ण खर्च दिला पाहिजे. परंतु १६० मी.चे काम करतो. रु.४८.६३ लक्षची निविदा निघते ते काम २८ टक्के जास्त दराने देतो. पुन्हा १६० मीटरचे काम करायचे लक्षात येते. पाईप आपण देणार व ठेकेदारास वाढीव रु.१५.२६ लक्ष देऊन काम करणार आहे. पुन्हा त्यात रु.५.३८ लक्ष अतिरिक्त बाब म्हणून देतो ते काम पुर्ण झाले नाही.

कार्य.अभियंता :या सर्व कामासाठी लागणारा खर्च ॲडीशनल केला आहे.

श्री.राजू शिंदे :त्या वेळीच टेंडर ३२० मी.चे का काढले नाही? १६० मी.साठी टेंडर काढता, पुन्हा १६० मी.चे काम त्याच ठेकेदाराला टेंडर न काढता काम देतो. त्या ठेकेदाराची काम करण्याची कॅपॅसिटी व काम केल्याचा अनुभव आहे का?

मा.महापौर :एक्स्ट्रा ॲटम व क्वॉन्टीटी तपासल्या आहेत का? तपासली नसेल तर तपासून घ्यावे.

श्री.राजू शिंदे :९ ठिकाणी काम करायचे आहे. रु.९ कोटी लागणार आहे. हा खर्च मनपास करण्याची गरज नाही. हे काम करण्याची जबाबदारी कुणाची आहे? हे काम पीडब्ल्युडीने करायला पाहिजे. त्याची जबाबदारी आहे. त्या विभागाचे काम सुरू केले. त्यांनी करून घ्यावे.

कार्य.अभियंता :अटी शर्ती काय आहेत? ते बघून घेतो.

श्री.राजू शिंदे :रु.८० लक्ष एका ठेकेदारासाठी खर्च करीत आहे. जनतेचा पैसा वाया जातो त्यालाच काम वाढून देता. १६० मी.ची लाईन खाली करतो म्हणून समोरच्या व्यक्तीकडून पैसे घेतले आता पुढची १६० मी.करतो म्हणुन पुढचा जो व्यक्ती आहे. त्यांचेकडून पैसे घेतले. जे की, त्या व्यक्तीची तेथे प्लॉटींग चालू आहे. एखाद्या प्लॉटींगला चांगला भाव यावा. म्हणुन मनपाच्या खर्चातून पाइप लाईन खाली करून देतो आहे. सक्षम मान्यता घेतली असे म्हटले तर हे समोर आले कशासाठी?

मा.महापौर :हे सर्व संशयास्पद आहे. हे तपासलेले नाही. जबाबदारी मनपाची असेल तर ठिक आहे. एकूण रु.८० लक्षचा हा विषय आहे. महापालिका आर्थीक संकटात असतांना हा विषय आलेला आहे. याची चौकशी होणे आवश्यक आहे. ह्या विषयानुसार सर्व तपासणी करावी. अहवाल द्यावा हा विषय स्थगित करण्यात येतो.

श्री.राजू शिंदे :त्याची उंची काही ठिकाणी अडीच, चार तर काही ठिकाणी ७ फुट आहे. पाईप कुठे अंथरणार आहे. तो ठेकेदार काम करण्यास सक्षम आहे ते ही तपासावे.

मा.महापौर :हा विषय स्थगित करण्यात येतो चौकशी करावी अहवाल आठ दिवसात द्यावा

श्री.त्र्यंबक तुपे :कोणी अंदाजपत्रक तयार केले? कोण अधिकारी होते? एका कामासाठी रु.८० लक्ष जात असेल व मनपाचा पैसा खर्च होऊन प्लॉटवाले करोडो रूपये कमवित असेल तर हे ही योग्य नाही. मुद्दामहून कोणी अंदाजपत्रक तयार केले असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी. मनपाची फसवणूक झाली असेल तर गुन्हे दाखल करावे. हे काम कोणी करायला पाहिजे होते? तोही खुलासा घ्यावा.

मा.महापौर :हे प्रकरण गंभीर व संशयास्पद आहे. आर्थिक परिस्थिती खराब असतांना असे प्रस्ताव येणे किंवा कुणाची जबाबदारी होती. सर्व समोर यावे. शहर अभियंता श्री.पानझडे यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणूक करण्यात येते. प्रस्ताव कसा आला? कुणामूळे आला? कुणाला लाभ द्यायचा होता? ते काम मनपाने करायचे होते का? याचा चौकशी अहवाल आठ दिवसात सादर करावा.

श्री.राजू शिंदे :यात फसवणूक झाली असेल तर गुन्हा दाखल सुध्दा झाला पाहिजे. यापुर्वी ज्या-ज्या चौकशा लावलेल्या आहेत. त्याचाही अहवाल द्यावा.

मा.महापौर :ज्या-ज्या प्रकरणाच्या चौकशा लावण्यात आलेल्या आहेत. त्याचाही अहवाल देण्यात यावा.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत विषयाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार हे काम करण्याची कुणाची जबाबदारी होती? हा प्रस्ताव कसा आला? कुणामूळे आला? महापालिकेने काम करणे आवश्यक होते का? कोणाच्या लाभासाठी हे करतो आहे का? या सर्व बाबतीत चौकशी करण्यासाठी शहर अभियंता श्री.पानझडे यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमणूक करण्यात येते. या प्रकरणाची आठ दिवसात त्यांनी चौकशी करून अहवाल सादर करावा. तुर्त हा विषय स्थगित करण्यात येतो.

**<u>विषय क्रमांक ५८१:-</u>** **(शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११३, रेणुकानगर येथील बालाजी किराणा जवळील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-२०१६ नुसार र.रु.८२,२७,९८१/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.०५.०७.२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ लेखाशिर्ष भांडवली खर्च-अ अंदाजपत्रक मा.महापौर यांनी सुचविलेली अत्यावश्यक कामामधून प्रस्तावित आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.८२,२७,९८१/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११३, रेणुकानगर येथील बालाजी किराणा जवळील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे र.रु.८२,२७,९८१/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५८२:-</u>** **(शहर अभियंता)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.६५ या प्रभागातील सेव्हन हिल ते बायजीपुरा या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक दुरूस्ती व कॉंक्रीट करणे. या कामाचे अंदाजपत्रक अर्थसंकल्प सन २०१६-१७ एस.सी.आर. वॉर्ड-फ अ.क्र.२ पृष्ठ क्र.४८ तरतुद रु.४० लक्ष

मधून र.रु.३,९६,८००/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावीत कामास मान्यता होऊन कार्यादेश दि.१८.०३.२०१७ ला देण्यात आला.

सदर प्रकरणी स.नगरसेविका सौ.राखी प्रशांत देसरडा, वॉर्ड क्र.६५ यांनी कळविले की, प्रस्तावित कामाच्या ठिकाणी लवकरच कॉंक्रीट रस्ता (१५० कोटी मधून) हाती घेणार असल्याने प्रस्तावीत पेव्हर दुरूस्ती कामाचा उपयोग होणार नाही. त्याऐवजी याच वॉर्डातील मार्तंड विहार बायजीपुरा सुराणानगर जवळील रस्त्यावर पेव्हर बसविण्याची आवश्यकता असल्याने हे काम त्या ठिकाणी हाती घ्यावे.

वरील प्रमाणे बदल करून काम करावयाचे झाल्यास त्यास स्थळ बदलाची मान्यता होणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रकीय दरात कुठलीही वाढ न करता फक्त स्थळ बदलास मान्यता होणे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६५ या प्रभागातील सेव्हन हिल ते बायजीपुरा या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक दुरूस्ती व कॉंक्रीट करणेच्या कामाऐवजी याच वॉर्डातील मार्तंड विहार, बायजीपुरा सुराणानगर जवळील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाच्या र.रु.३,९६,८००/- च्या अंदाजपत्रकास व कामाच्या स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५८३:-</u>** **(मालमत्ता विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.०७ अंतर्गत वॉर्ड क्र.७८, विद्यानगर येथील मनपाच्या खुल्या जागेत नवीन बॅटमिंटन हॉल बांधणे कामाचे कार्यादेश जा.क्र.मनपा/झोन क्र.७/उपअभि/ ५८/२०१८ दिनांक १६.०१.२०१८ रोजी झालेला असून सदरील बॅटमिंटन हॉलच्या कामामध्ये विद्यानगर अंतर्गत विजयनगर येथील मनपाच्या खुल्या जागे ऐवजी अलंकार हौ.सोसायटी खुल्या जागेत बॅटमिंटन हॉल बांधणेच्या बाबतचा स्थळ बदल करणे स.सदस्य श्री.रेणुकादास राजु वैद्य यांनी दिनांक १८.०१.२०१८ रोजी पत्र दिले आहे.

करीता, सदरील कामास विद्यानगर अंतर्गत विजयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत बॅटमिंटन हॉल बांधणे ऐवजी अलंकार हौ.सोसायटी येथील मनपाच्या खुल्या जागेत बांधणेच्या स्थळ बदल करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.०७ अंतर्गत वॉर्ड क्र.७८, विद्यानगर येथील मनपाच्या खुल्या जागेत नवीन बॅटमिंटन हॉल बांधणे याऐवजी अलंकार हौ.सोसायटी येथील मनपाच्या खुल्या जागेत बांधणेच्या कामाचे स्थळ बदल करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५८४:-</u>** **(आस्थापना अधिकारी-१)**

**टिप:- (दि.०९.०२.२०१८ रोजीच्या सभेतील विषय क्रमांक-१९७ हा प्रस्ताव उपआयुक्त (म) यांचेकडील पत्र जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१८/१०६५ दि.१६.०७.२०१८ च्या अनुषंगाने पुनर्विचारार्थ सादर.)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.के.एम.फालक, शाखा अभियंता हे प्रभारी उपअभियंता, जायकवाडी पाणी पुरवठा (स्थापत्य) म्हणून कार्यरत असतांना हर्सुल तलावातील गाळ काढणे या कामामध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्या. ज्यामध्ये १) गैरलागू दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकाची शहानिशा न करता मंजूरीसाठी सादर केले. याबाबतीतल्या शासनाच्या नियमांचे पालन केले नाही, २) दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयाचे पूर्णत: उल्लंघन करणे, ३) निविदा सूचनामधील अटी/शर्ती शासन नियमांविरुध्द असून अनावश्यक उच्च दर्जाच्या ठेकेदाराची पात्रता ठेवणे, ४) दिनांक ०२/०३/२००९ च्या शासन निर्णयानुसार एक कोटी पेक्षा

जास्त रकमेच्या कामासाठी तृतीय पक्ष तांत्रिक लेखापरीक्षण आवश्यक असतांना शासनाचे निर्देश डावलून देयक अदाईस्तव सादर करणे. या अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधिता विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ५,४००/- अशी आहे.

करीता, श्री.के.एम.फालक, शाखा अभियंता यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

**<u>विषय क्रमांक ५८५:-</u>** **(आस्थापना अधिकारी-१)**

**टिप:- (दि. ०९.०२.२०१८ रोजीच्या सभेतील विषय क्रमांक-१९८ हा प्रस्ताव उपआयुक्त (म) यांचेकडील पत्र जा.क्र.मनपा/आस्था-१/२०१८/१०६५ दि.१६.०७.२०१८ च्या अनुषंगाने पुनर्विचारार्थ सादर.)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.एच.ए.कोल्हे, कार्यकारी अभियंता (वॉर्ड क्र.१,२,३,९) हे पाणी पुरवठा विभागाचे विभाग प्रमूख म्हणून कार्यरत असताना हर्सुल तलावातील गाळ काढणे या कामामध्ये गंभीर अनियमितता आढळून आल्या. ज्यामध्ये १) गैरलागू दरसूचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकाची शहानिशा न करता मंजूरीसाठी सादर केले. पाणीपुरवठा विभागप्रमुख म्हणून याबाबतीतल्या शासनाच्या नियमांचे पालन केले नाही, २) निविदा प्रक्रिया करताना विशिष्ट व्यक्तीस काम मिळावे या असद्हेतूने निविदेस योग्य ती प्रसिध्दी न देणे, कनिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी राज्यस्तरीय जास्त खपाच्या वर्तमानपत्रात प्रसिध्दी देणेबाबत सादरीकरण केले असताना उच्च पदाच्या अधिकाराचा गैरवापर करुन सर्वसामान्यांच्या नजरेस न येणाऱ्या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन विशिष्ट मर्जीतील व्यक्तीस सदरचे काम मिळविण्यासाठी प्रयत्न करणे, ३) दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजीच्या शासन निर्णयाचे पूर्णतः उल्लंघन करणे, ४) निविदा सूचनामधील अटी शर्ती शासन नियमांविरुध्द असून अनावश्यक उच्च दर्जाच्या ठेकेदाराची पात्रता ठेवणे, ५) दिनांक ०२/०३/२००९ च्या शासन निर्णयानुसार एक कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कामासाठी तृतीय पक्ष तांत्रिक लेखापरीक्षण आवश्यक असताना शासनाचे निर्देश डावलून देयक अदाईस्तव सादर करणे. या अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधिता विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६,६००/- अशी आहे.

करीता, श्री.एच.ए.कोल्हे, कार्यकारी अभियंता (वॉर्ड क्र.१,२,३,९) यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

**<u>चर्चा:-</u>**

श्री.दिलीप थोरात :औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये कामे करण्यासाठी कोणती दरसुची वापरली जाते? याचा खुलासा झाला पाहिजे. अशाच प्रकारची कामे महानगरपालिकेच्या माध्यमातून यापुर्वी करण्यात आली आहेत, त्या कामांसाठी कुठली दरसुची वापरण्यात आली आहे? या दोन गोष्टींचा खुलासा करण्यात यावा. अशाच

प्रकारची कामे कमल तलाव आणि सलिम अली सरोवराच्या बाबतीत केलेली आहेत, त्यासाठी कुठली दरसुची वापरण्यात आली होती? आणि आपण कोणती दरसुची वापरतो?

मा.महापौर :सदस्यांनी ज्या सुचना मांडल्यात त्याची दखल घेऊन खुलासा प्रशासनाकडून करावा. विषय क्रमांक-५८४ आणि ५८५ च्या अनुषंगाने निर्णय देत असतांना औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये गाळ काढण्याच्या निविदा या महाराष्ट्र जीवन प्राधीकरण मंडळाच्या दरसुचीतील दर घेऊन काढण्यात आलेल्या आहेत. प्रशासकीय मान्यता/स्थायी समितीची मान्यता/ सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन कार्यवाही करण्यात येते. अशा प्रकारची अनेक कामे महानगरपालिकेतील विविध विभागांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीतील दर घेऊन करण्यात आलेली असून त्यांची देयके सुध्दा अदा करण्यात आलेली आहेत. हर्सुल तलावातील गाळ काढण्याच्या कामासाठी देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीतील दर घेऊन काम केलेले आहे. अद्यापही देयक अदा केलेले नाही. महानगरपालिकेची स्वत:ची दरसुची नसल्याने हर्सुल धरणातील गाळ काढण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीने प्रचलित पध्दती नुसार अंदाजपत्रक तयार करून ई-निविदा मार्फत कार्यवाही केलेली असल्याने गैर वाटत नाही.

श्री.राजु शिंदे :असेच आरोप शहर अभियंता श्री.पानझडे यांच्यावर लावण्यात आले होते. त्यांच्या चौकशीचा अहवाल आला का?

मा.महापौर :उपआयुक्त (म) यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म) :हर्सुल गाळ प्रकरणी श्री.पानझडे यांची चौकशी करण्यासाठी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांचा अंतिम चौकशी अहवाल नुकताच प्राप्त झाला असून सदर चौकशी अहवालात श्री.पानझडे यांच्यावरील दोषारोप सिध्द होत नाहीत. असे या अहवालात नमुद करण्यात आले आहे.

श्री.प्रमोद राठोड :माहितीस्तव चौकशी अहवाल द्यायला पाहिजे.

मा.महापौर :माहितीस्तव अवलोकनार्थ सदर चौकशी अहवाल मा.महापौर यांचेकडे देण्यात यावा.

श्री.प्रमोद राठोड :एकाला विभागीय चौकशीमध्ये दोष मुक्त केले आणि दोघांची विभागीय चौकशी करण्याचे सांगत आहेत.

उपआयुक्त (म) :सर्वसाधारण सभेसमोर जो प्रस्ताव पाठविलेला आहे तो अगोदर पाठविलेला आहे आणि विभागीय चौकशीचा अहवाल आता प्राप्त झालेला आहे.

श्री.प्रमोद राठोड :यामध्ये प्रशासनाचे मत काय आहे? हे दोन्ही प्रस्ताव तुम्ही परत घेत आहेत का?

मा.महापौर :या दोन प्रस्तावांमध्ये सभागृहाचा त्यांना स्पष्ट निर्णय पाहिजे होता.

श्री.त्र्यंबक तुपे :याच्या आधी विभागीय चौकशी करावी किंवा नाही असा श्री.पानझडे साहेबांचा ठराव आला होता. त्याचा अहवाल दोन दिवसांआधी आला असेल तर सभेसमोर मांडला गेला पाहिजे होता.

श्री.प्रमोद राठोड :प्रस्ताव रद्द करीत आहात सभागृहाच्या भावना कळाल्या आहेत. परंतु, यामध्ये प्रशासनाची भुमिका काय आहे? अर्धवट माहितीच्या आधारे प्रस्ताव ठेवला आहे का?

श्री.दिलीप थोरात :याच प्रकरणामध्ये चौकशी झालेली आहे आणि त्याचा अहवाल जर आला असेल तर तो सभागृहासमोर ठेवला असता तर चर्चा करण्याची आवश्यकता नव्हती.

मा.महापौर :त्या चौकशी अहवालामध्ये ते निर्दोष असतील तर सभागृहासमोर हे दोन्ही ठराव ठेवण्याची गरजच नव्हती.

श्री.त्र्यंबक तुपे :श्री.पानझडे साहेबांचा चौकशी अहवाल कधी आला? आणि विषय पत्रिकेमध्ये हे दोन्ही ठराव कधी आले?

मा.महापौर :दिनांक १६.०७.२०१८ रोजी हे दोन्ही ठराव पुर्नविचारार्थ ठेवण्याबाबत पत्र आलेले आहे. स.सदस्यांचे म्हणणे आहे की, दिनांक १६.०७.२०१८ च्या आधी जर श्री.पानझडे साहेबांचा चौकशी अहवाल आला असेल तर हा प्रस्ताव ठेवण्याची आवश्यकता नव्हती. श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता, महानगरपालिका यांच्या चौकशी अहवालाचे पत्र प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांचेकडून दिनांक २७.०७.२०१८ रोजी प्राप्त झाले आहे. त्याच्या आधी सदर प्रस्ताव ठेवण्यात आले आहेत.

श्री.प्रमोद राठोड :सदरचे दोन्ही ठराव आपण रद्द करण्यापेक्षा प्रशासनाला रद्द करण्यासाठी सांगावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :विभागीय चौकशी अधिकारी यांनी जो चौकशी अहवाल दिलेला आहे तो नियमानुसार सर्वसाधारण सभेसमोर आला पाहिजे.

मा.महापौर :उपआयुक्त (म) यांनी खुलासा केल्याप्रमाणे या विषयामधील जे दोषारोप आहेत, तेच दोषारोप श्री.पानझडे यांच्या वर लावण्यात आले होते. त्यांच्या चौकशीमध्ये ते सिध्द झालेले नाहीत. त्यामुळे विभागीय चौकशीची आवश्यकता नाही. विषय क्रमांक-५८४ आणि ५८५ हे दोन्ही विभागीय चौकशीचे ठराव या ठिकाणी रद्द करण्यात येत आहेत. ज्याप्रमाणे निर्णय दिला तो प्रशासनाला लागू राहील.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये गाळ काढण्याच्या निविदा या महाराष्ट्र जीवन प्राधीकरण मंडळाच्या दरसुचीतील दर घेऊन काढण्यात आलेल्या आहेत. प्रशासकीय मान्यता/स्थायी समितीची मान्यता/सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन कार्यवाही करण्यात येते. अशा प्रकारची अनेक कामे महानगरपालिकेतील विविध विभागांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीतील दर घेऊन करण्यात आलेली असून त्यांची देयके सुध्दा अदा करण्यात आलेली आहेत. हर्सुल तलावातील गाळ काढण्याच्या कामासाठी देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीतील दर घेऊन काम केलेले आहे. महानगरपालिकेची स्वतःची दरसुची नसल्याने हर्सुल धरणातील गाळ काढण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीने प्रचलित पध्दतीनुसार अंदाजपत्रक तयार करून ई-निविदा मार्फत कार्यवाही केलेली असल्याने गैर वाटत नाही. उपआयुक्त (म) यांनी खुलासा केल्याप्रमाणे या विषयामधील जे दोषारोप आहेत, तेच दोषारोप श्री.पानझडे यांच्या वर लावण्यात आले होते. त्यांच्या चौकशीमध्ये ते सिध्द झालेले नाहीत. त्यामुळे (१) श्री.के.एम.फालक, शाखा अभियंता व (२) श्री.एच.ए.कोल्हे, कार्यकारी अभियंता (वॉर्ड क्र.१,२,३,९) यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याची

आवश्यकता नाही. विषय क्रमांक-५८४ आणि ५८५ हे दोन्ही विभागीय चौकशीचे ठराव या ठिकाणी रद्द करण्यात येत आहेत.

**<u>विषय क्रमांक ५८६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका औरंगाबाद येथील शिक्षण विभागात बरेच सहाय्यक शिक्षकाची जागा रिक्त आहेत. असे समजले आहे. श्रीमती सरवत जा मोहमद अब्दुल रऊफ ह्या भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका भिवंडी येथे सहाय्यक शिक्षिका म्हणुन काम करीत आहेत. त्यामुळे औरंगाबाद येथील रहिवासी असून त्यांची आई वयोवृध्द आहेत. श्रीमती सरवत जहा मोहमद अब्दुल रऊफ यांची आई पुर्णत: त्यांच्यावर अवलंबून असून उच्च रक्तदाब तसेच सांधे वात या आजाराने त्रस्त आहेत. त्यांच्या आईची देखभाल करण्यासाठी त्यांना नेहमी भिवंडी ते औरंगाबाद असे येणे-जाणे करावे लागत आहे. करीता संबंधीताने आंतरजिल्हा बदलीसाठी औरंगाबाद महानगरपालिका अगोदर अर्ज केलेला आहे.

शिक्षणाधिकारी, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, शिक्षण मंडळ, भिवंडी यांचे पत्र क्र.७३४ दिनांक ०९.०७.२०१८ अन्वये श्रीमती सरवत जहा मोहमद अब्दुल रऊफ यांना भिवंडी येथून कार्यमुक्त करण्याबाबत कळविण्यात आले आहे. एकतर्फी आंतरजिल्हा बदलीसाठी इच्छुक असलेल्या श्रीमती सरवत जहा मोहमद अब्दुल रऊफ यांना औरंगाबाद महानगरपालिकेतून बदली बाबत नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.एडके विकास प्रकाश **अनुमोदक:-**श्रीमती तसनीम बेगम अब्दुल रऊफ

श्री.भगवान घडमोडे :गेल्या १० वर्षात किती प्रस्ताव असे केलेले आहेत? किती लोकांना घेतले सामावून करून घेण्याची नियमावली आहे? ज्यांचा पती कंपनीत आहे त्यांना सुध्दा येथील सेवेत घेतले

श्री.राजगौरव वानखेडे :जिल्हा परिषदेचे शिक्षक घ्यावेत म्हणुन तीस प्रस्ताव मनपात आहेत. जि.प. मध्ये शिक्षकांच्या नवीन धोरणानुसार ३०-४० कि.मीटरवर बदल्या होत असल्याने ते मनपात येण्यास इच्छुक आहेत. हे प्रस्ताव प्रशासनाकडून यावेत. किती प्रकरणे प्रलंबीत आहेत?

श्री.कमलाकर जगताप :उर्दु व मराठी माध्यमचे किती मुख्याध्यापकाची पदे मंजूर व रिक्त आहे?

शिक्षणाधिकारी :मुख्याध्यापकाची २९ पदे आहे त्यापैकी ६ पदे रिक्त आहेत. उर्दु माध्यमासाठी १२८ पदे मंजूर आहेत. उर्दु माध्यमचे ६ शिक्षक घेता येतील. मराठी माध्यमाच्या रिक्त पदावर मुख्याध्यापकाचे प्रमोशन दिल्या शिवाय घेता येणार नाही.

श्री.भगवान घडमोडे :नियमानुसार एखाद्या संस्थेमधून दुसऱ्या संस्थेत बदली करता येते का?

शिक्षणाधिकारी :आंतरजिल्हा बदली मध्ये बदली करता येते. एक दुसऱ्या मनपा मध्ये बदली करता येते.

श्री.राजेंद्र जंजाळ :मनपा ही शहराची संस्था आहे. येथे रिक्त जागा असतील, त्यावर स्थानिक लोकांना संधी मिळायला पाहिजे. जर बाहेर जिल्ह्यातील शिक्षक घेत असाल तर स्थानिक जे पदवीधर शिक्षक असतील त्यांचेवर अन्याय होत नाही का?

शिक्षणाधिकारी :भरती करण्याचे अधिकार शासनास आहे. बाहेरील उमेदवार घेता येतो किंवा शासनाकडे पद भरण्याची मागणी करता येते.

श्री.राजेंद्र जंजाळ :राज्यशासनाला भरती करण्याचे सांगावे. स्थानिक लोकांना संधी मिळेल. नियुक्ती प्राधीकरण सर्वसाधारण सभा आहे. शासनाला अधिकार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :रिक्त जागा किती आहेत? रिक्त पदे भरतांना महापालिकेचे एक धोरण निश्चित असायला पाहिजे. या दोन्ही ठरावाला स्थगिती द्यावी. योग्य वाटत असेल तर हे प्रशासकीय प्रस्ताव यावेत.

श्री.त्र्यंबक तुपे :इतर शिक्षक येथे घेऊ नये असा ठराव घेतला. पुन्हा घेण्यास सुरूवात केली महापालिकेने धोरण नियमावली ठरविली पाहिजे. त्यानुसार प्रस्ताव यायला पाहिजे. स्थानिक शिक्षकांना संधी मिळाली पाहिजे. शासनाकडून भरती करण्याची मागणी केली पाहिजे.

श्री.जमीर कादरी :या प्रस्तावानुसार हे शिक्षक प्रॉपर औरंगाबादचे आहे. ते तेथे नोकरी करीत होते. यापूर्वी ५-६ ठराव मंजूर केलेले आहे. स्थानिक लोकांना संधी मिळायला पाहिजे सहमत आहे. परंतु यापुढे धोरण ठरवावे त्यानुसार घ्यावे. हा विषय मंजूर करावा.

(या वेळी मा.आयुक्त सभागृहात प्रवेश करतात.)

श्री.विकास जैन :यापूर्वी ठराव केले ते लोक कार्यरत झाले. ते कसे शिकवितात? याची माहिती घेतो का?

शिक्षणाधिकारी :पोलीस केस किंवा डी ई नाही. एवढेच बघतो. बाकी रेकॉर्ड घेत नाही. सर्वीस किती आहे. याचा विचार नाही. ५० टक्के राज्यशासन व ५० टक्के मनपा वेतन करते.

श्री.भगवान घडमोडे :भिवंडीचे शिक्षक औरंगाबाद मनपात घ्यायचे हे आंतर जिल्हा बदली मध्ये बसतात का? शासनाकडे पद भरण्याबाबत मागणी का करीत नाही?

शिक्षणाधिकारी :तपासणी केलेली नाही. हा प्रस्ताव प्रशासकीय नाही.

श्री.प्रमोद राठोड :पद भरण्याची आवश्यकता असते तर जाहीरात का देत नाही?

श्री.त्र्यंबक तुपे :राज्यशासनाकडून पुर्ण पगार व मनपाचा ५० टक्के पगार उचलत आहे. असा प्रकार आहे का? तसेच त्यांची सेवा किती आहे? हे सुध्दा विचारात घेतले जावे. महापालिकेच्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांना आत्मियता असली पाहिजे. असे शिक्षक घेतांना धोरण ठरविले पाहिजे. नियमावली बनवून शासनाकडे पाठविले पाहिजे. जे तरूण, नवीन शिक्षक आहेत त्यांना संधी मिळाली पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे :नियमात बसत नाही अशाही लोकांना येथे संधी दिली. कपंनीत असलेल्या व्यक्तीच्या कुटूंबातील शिक्षकांना घेतले गेले. हे योग्य नाही. जे सेवेत आहे ते येथे येतात व येथील जो स्थानिक तरूण शिक्षक असतो त्यांचा अधिकार घेतो हे योग्य नाही. मागिल सर्व प्रकरणाची चौकशी करावी. अहवाल घ्यावा.

श्री.विकास जैन :येथून किती शिक्षक नोकरी सोडून गेलेले आहे?

मा.महापौर :या बाबत धोरण निश्चित करणे सुचना मांडली. रिक्त जागा किती आहे? किती आवश्यकता आहे? प्रशासनाने सर्व बाबी तपासून घ्याव्यात. प्रशासनाने धोरण ठरवून निर्णय घ्यावा.

श्री.विकास एडके :यापुर्वी जे शिक्षक घेण्याचे निर्णय झाले ते मागे घ्यावे त्यावेळी ही धोरण ठरविले नव्हते.

मा.महापौर :यापुर्वीच्या प्रकरणाच्या बाबतीत सुध्दा जे धोरण ठरविले जाईल त्यानुसार व आवश्यकता असेल तरच कार्यवाही करावी. मा.आयुक्तांनी तपासून धोरण निश्चित करून योग्य तो निर्णय घ्यावा. हा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सरवत जहा मोहमद अब्दुल रऊफ, सहाय्यक शिक्षिका, भिवंडी यांची एकतर्फी आंतरजिल्हा बदलीसाठी औरंगाबाद महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा शाळा क्र.५६ उर्दु मेहरून, जळगाव येथे मागील सात वर्ष १० महिन्यापासून उर्दु भाषेचे उपशिक्षक म्हणुन कार्यरत असलेले श्री.साजेद खान जावेद खान हे मुळ औरंगाबाद येथील रहिवासी असून त्यांचे आईवडील वयोवृध्द असल्याने त्यांची वृध्दापकाळात आरोग्याची व औषधोपचाराची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतावर आहे. संबंधीतांची एकतर्फी आंतरजिल्हा बदली करण्यासाठी सर्वसाधारण सभा जळगाव महानगरपालिकेने प्रस्ताव मंजुर केलेला आहे. तरी वरील बाबींचा सहानुभूतीपुर्वक विचार करून सध्या औरंगाबाद महानगरपालिकेत उर्दु भाषेच्या शिक्षकाची आवश्यकता असल्याने संबंधीताची एकतर्फी आंतरजिल्हा बदलीचा प्रस्ताव मंजुर करुन त्यांची सेवा औरंगाबाद महानगरपालिकेकडे वर्ग करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

**अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे, श्री.विकास प्रकाश एडके

मा.महापौर :या बाबत धोरण निश्चित करणे सुचना मांडली. रिक्त जागा किती आहे? किती आवश्यकता आहे? प्रशासनाने सर्व बाबी तपासून घ्याव्यात. प्रशासनाने धोरण ठरवून निर्णय घ्यावा. यापुर्वीच्या प्रकरणाच्या बाबतीत सुध्दा जे धोरण ठरविले जाईल त्यानुसार व आवश्यकता असेल तरच कार्यवाही करावी. मा.आयुक्तांनी सर्व बाबी तपासून धोरण निश्चित करून योग्य तो निर्णय घ्यावा.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या बाबत धोरण निश्चित करणे सुचना मांडली. रिक्त जागा किती आहे? किती आवश्यकता आहे? मा.आयुक्तांनी सर्व बाबी तपासून घ्याव्यात व प्रशासनाने धोरण ठरवून निर्णय घ्यावा. यापुर्वीच्या प्रकरणाच्या बाबतीत सुध्दा जे धोरण ठरविले जाईल त्यानुसार आवश्यक ती नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ५८८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७ दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत इंदिरानगर, बजरंगनगर या भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे प्रस्तावित होते. परंतु सदर योजनेअंतर्गत निधी प्राप्त न झाल्याने हे काम होऊ शकले नसून यासाठी मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये पान क्र. झोन ०७ स्पिल पेज नं.१८४ सिरीयल नं.११२ अन्वये सदर कामासाठी एकूण ४९.७६ लक्षची तरतुद केलेली आहे. करीता सदर काम मनपा फंडातून करण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सिमा कहानुलाल चक्रनारायण **अनुमोदक:-**श्री.गजानन भानूदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७ येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत इंदिरानगर, बजरंगनगर या भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणेच्या कामासाठी निधी प्राप्त न झाल्याने र.रु.४९.७६ लक्षची तरतुद मनपा फंडातून करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४९, भडकलगेट, बुढ्ढीलेन येथील नागरीकांच्या सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे. करीता विनंती की, खालील कामांचे लेखाशिर्ष बदलुन तरतुद वळती करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र.पान क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|---|
| Zone No.1 Spill P.No.28 Sr.No.2 | औरंगपुरा येथील नाल्याची संरक्षण भिंतीची उंची वाढविणे. (तरतुद) र.रु.२.२९ लक्ष | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत टाऊन हॉल येथील श्री.संतोष गायकवाड यांच्या गल्लीत पेव्हर ब्लॉक बसविणे. | र.रु.२.२९ लक्ष |

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४९, भडकलगेट, बुढ्ढीलेन येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र.पान क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|---|
| Zone No.1 Spill P.No.28 Sr.No.2 | औरंगपुरा येथील नाल्याची संरक्षण भिंतीची उंची वाढविणे. (तरतुद) र.रु.२.२९ लक्ष | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत टाऊन हॉल येथील श्री.संतोष गायकवाड यांच्या गल्लीत पेव्हर ब्लॉक बसविणे. | र.रु.२.२९ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षी प्रमाणे या वर्षी १ ऑगस्ट २०१८ रोजी अण्णाभाऊ साठे यांची ९८ वी जयंती असून अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन व अण्णाभाऊ साठे सर्व पक्षीय शहर जिल्हा जयंती उत्सव महासंघ समितीतर्फे वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात येते. मनपातर्फे विशेष बाब म्हणुन र.रु.१ लाखचा निधी तात्काळ देण्यात यावी.करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.
**सुचक:-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले **अनुमोदक:-**श्रीमती सरीता अरुण बोर्डे, श्री.गंगाधर नामदेव ढगे
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १ ऑगस्ट २०१८ रोजी अण्णाभाऊ साठे यांची ९८ वी जयंती असून अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन व अण्णाभाऊ साठे सर्व पक्षीय शहर जिल्हा जयंती उत्सव महासंघ समितीस मनपातर्फे विशेष बाब म्हणुन र.रु.१ लाखाचा निधी तात्काळ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन १९९२-९३ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेत शासन पुरस्कृत गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजना (यु.बी.एस.पी.) या योजने अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यासाठी श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड यांचे समुदाय संघटक या पदावर विहित पध्दतीचा (योग्य मार्गाने) अवलंब करून निवड समितीच्या शिफारशी नुसार दि.२६.११.१९९३ रोजी रु.१२००/- प्रतिमाह मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर महिला कर्मचाऱ्याला कोणताही खंड न देता सदर महिला कर्मचारी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आजमितीस कार्यरत आहे. सदर महिला

कर्मचाऱ्याला मनपा प्रशासनाने शासनाकडून प्राप्त आदेशानुसार वेळोवेळी शासनाच्या मार्गदर्शनानुसार वाढीव मानधन व त्यांचे काम समाधानकारक असल्याने त्यांना वार्षिक वेतनवाढी नियमितपणे देण्यात आलेली आहे. सदर महिला कर्मचाऱ्याची सेवा विनाखंड न देता आजमितीस २४ वर्ष इतकी सेवा झालेली आहे. सदर महिला कर्मचाऱ्याची नोकरीची कमाल वयोमर्यादा संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे त्यांना भविष्यात नोकरीची सुरक्षितता राहिलेली नाही. महानगरपालिकेमध्ये वेळोवेळी रिक्त असलेल्या जागेवर विहित पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना मनपा आस्थापनेवर प्रशासनाने रिक्त जागेवर नियमित वेतनश्रेणीत सामावून घेतलेले आहे असे समजते की, महानगरपालिका आस्थापनेवर सन १९९८ ते २००४ या कालावधीमध्ये समुदाय संघटक या पदाची दोन पदे रिक्त होती दि.०१.०४.१९९८ (१)श्री.एस.एम.माहोरे यांचा राजीनामा (२) श्री.महेंद्र यादव दि.२२ ऑगस्ट २००४ मयत.

तसेच असेही समजते की, नाशिक महानगरपालिका इतर महापालिकेने शासन पुरस्कृत गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजना (UBSP) या कार्यक्रमाअंतर्गत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना ज्या कर्मचाऱ्यांची सेवा सलग पाच वर्ष पुर्ण झाली होती. अशा कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेलेले आहेत. सदर महिला कर्मचाऱ्याची केलेली सलग २४ वर्षाची सेवा पाहता यांना ही मनपा औरंगाबाद आस्थापनेवर रिक्त असलेल्या समुदाय संघटक या पदावर इतर महापालिकेच्या धर्तीवर पद रिक्त झालेल्या तारखेपासून नियमित वेतन श्रेणीत कायम स्वरुपी नियुक्ती देणे आवश्यक होते. परंतु मनपा प्रशासनाने ती कार्यवाही केलेली नाही.

शासनाने वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत की, विहीत पध्दतीने नियुक्त झालेल्या अस्थायी कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या आस्थापनेवर जागा रिक्त असल्यास त्या कर्मचाऱ्यास नियमित स्वरुपात सामावून घेणे असे शासनाचे निर्देश असतानाही औरंगाबाद महापालिका प्रशासनाने आदेशाचे पालन केलेले दिसून येत नाही. यापुर्वी मनपा प्रशासनाने बऱ्याच कर्मचाऱ्यांना विहित (योग्य मार्गाने) पध्दतीने नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना रिक्त असलेल्या जागेवर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती दिलेली आहे. करीता याच पध्दतीने श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड यांची समुदाय संघटक या पदावर विहीत पध्दतीचा अवलंब करून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच त्यांना प्रशासनाने आजमितीस कोणताही खंड दिलेला नाही. नाशिक महानगरपालिका व इतर महापालिकेने सदर योजने अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी नियुक्ती दिलेली आहे. त्याचप्रमाणे श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड यांना प्रथमतः रिक्त झालेल्या समुदाय संघटक या पदावर दि.०१.०४.१९९८ पासून पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी १४००-२६०० जुनी ४ था वेतन आयोग, ५ वे वेतन आयोग ४५००-७००० सहावा वेतन आयोग ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० मध्ये नियमित नियुक्ती देणे बाबत मान्यता व्हावी.

तसेच मनपा आस्थापनेच्या कर्मचाऱ्याप्रमाणे सेवा व सवलती अंतर्गत रजा व वेतनवाढ, भत्ता व इतर सर्व सवलती लागू करण्यात याव्यात. दि.०१.०४.१९९८ पासून सदर महिला कर्मचाऱ्याला महापालिकेच्या कर्मचाऱ्याप्रमाणे सर्व सवलती व पेंशन इ. लागू करावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे.

**अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, श्री.रमेश भानुदास जायभाय, श्रीमती पुष्पा उत्तमराव जगताप, श्रीमती विमल गोविंद केंद्रे, श्रीमती सीमा कहानुलाल चक्रनारायण, श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी, श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे, श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्रीमती कमल रामचंद्र नरोटे, श्री.गजानन भानुदास मनगटे, श्री.बन्सी ग्यानु जाधव, श्रीमती ज्योती सुनिल नाडे, श्री.पुनमचंद सोनाजी बमणे, श्रीमती लता मगन निकाळजे, श्री.आत्माराम माणिकराव पवार, श्रीमती मिना रामदास

गायके, श्रीमती सुनिता रामराव चव्हाण, श्री.कमलाकर शामराव जगताप, श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले, श्री.रामेश्वर बाबुराव भादवे.

श्री.नासेर सिद्दीकी :अशा प्रकारची कार्यवाही करू शकतो का विधी सल्लागार कडून माहिति घ्यावी.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेत शासन पुरस्कृत गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजना (यु.बी.एस.पी) या योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यासाठी श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड यांची समुदाय संघटक या पदावर विहित पध्दतीने कायदेशीर मार्गाने निवड समितीच्या शिफारशीनुसार मानधन तत्वावर सन-१९९३ मध्ये नियुक्ती करण्यात आलेली आहे. (यु.बी.एस.पी) ही शासकीय योजना महाराष्ट्रातील सर्वच महानगरपालिकांमध्ये राबविण्यात येत आहे.

सदर महिला कर्मचारी विनाखंड मनपा आस्थापनेवर सद्यस्थितीत कार्यरत आहे. आजमितीस त्यांची सेवा २४ वर्षे इतकी दिर्घकाळ झालेली आहे. त्यांची नोकरीची कमाल वयोमर्यादा संपुष्टात आलेली आहे. भविष्यात कोणतीही त्यांच्या नोकरीची सुरक्षितता राहीलेली नाही.

नाशिक महानगरपालिका व इतर महानगरपालिकेने (यु.बी.एस.पी.) या योजनेअंतर्गत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना ज्यांची सेवा पाच वर्षे पुर्ण झाली होती. अशा कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेतले आहे. त्या सर्व कर्मचाऱ्यांना सेवा विषयक फायदे देण्यात आलेले आहेत. औरंगाबाद मनपाने ही रिक्त पदे इतर मनपाप्रमाणे भरली असती तर सदर महिला कर्मचारी यांना लाभ मिळाला असता, यापुर्वी मनपा प्रशासनाने (योग्य मार्गाने) कायदेशीर मार्गाने निवड समितीने नियुक्ती झालेल्या मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांना रिक्त असलेल्या पदांवर नियमित वेतनश्रेणीने नियुक्ती दिलेली आहे.

श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड यांची विहीत पध्दतीने (योग्य मार्गाने) कायदेशीर मार्गाने झालेली निवड व त्यांची आजमितीस झालेली २४ वर्षाची सलग सेवा पाहता त्यांची मनपा आस्थापनेवर दि.०१.०४.१९९८ पासून प्रथमतः रिक्त झालेल्या समुदाय संघटक या पदावर पुर्वलक्षी प्रभावाने वेतनश्रेणी १४००-२६०० (जुनी ४ था वेतन आयोग), ४५००-७००० (जुना ५ वा वेतन आयोग), ५२००-२०२०० ग्रेडपे २८०० (६ वा वेतन आयोग) मध्ये नियमित कायमस्वरुपी नियुक्ती देणे बाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व सेवा विषयक सवलती व त्या अनुषंगीक लाभ देण्यासही मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**विषय क्रमांक ५९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३१ येथील खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

| अ.क्र. | जुने कामांचे नाव | नवीन करावयाच्या कामाचे नावे |
|---|---|---|
| १. | स्थायी समितीने शिफारस केलेली सन २०१८-१९ करीता झोन क्र.५ प्रभाग क्र.३१, अ.क्र.९, रायगडनगर, म्हाडा कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.५०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.३१ मध्ये विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.२ कोटी २५ लक्ष |
| २. | अ.क्र.१०, प्रभाग क्र.३१, अयोध्यानगर येथे विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.७५.०० लक्ष. | |
| ३. | SCR-Zone-05 P.No.21, अ.क्र.०५ वॉर्ड क्र.३१, शास्त्रीनगर एन-०७ अंतर्गत विविध विकास कामे करणे.अंदाजपत्रक र.रु.५०.०० लक्ष. | |

| | | |
|---|---|---|
| ४. | वॉर्ड क्र.३१, छत्रपतीनगर आर-२८ अंतर्गत विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.५०.०० लक्ष. | |
| **एकूण रक्कम रुपये** | | **२ कोटी २५ लक्ष** |

करीता वरील प्रमाणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३१ येथे खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने कामांचे नाव | नवीन करावयाच्या कामाचे नावे |
|---|---|---|
| १. | स्थायी समितीने शिफारस केलेली सन २०१८-१९ करीता झोन क्र.५ प्रभाग क्र.३१, अ.क्र.९, रायगडनगर, म्हाडा कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.५०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.३१ मध्ये विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.२ कोटी २५ लक्ष |
| २. | अ.क्र.१०, प्रभाग क्र.३१, अयोध्यानगर येथे विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.७५.०० लक्ष. | |
| ३. | SCR-Zone-05 P.No.21, अ.क्र.०५ वॉर्ड क्र.३१, शास्त्रीनगर एन-०७ अंतर्गत विविध विकास कामे करणे.अंदाजपत्रक र.रु.५०.०० लक्ष. | |
| ४. | वॉर्ड क्र.३१, छत्रपतीनगर आर-२८ अंतर्गत विविध विकास कामे करणे. अंदाजपत्रक र.रु.५०.०० लक्ष. | |
| **एकूण रक्कम रुपये** | | **रु.२ कोटी २५ लक्ष** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९३-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४ भारतनगर अंतर्गत या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर दलित वस्ती लोकसंख्या असून त्या ठिकाणी विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामांचे नाव | निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९४, भारतनगर अंतर्गत विविध ठिकाणी खडीकरण करणे. | रु.५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.९४, भारतनगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रोड तयार करणे. | रु.५० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.९४, भारतनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.५० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४ भारतनगर अंतर्गत दलित वस्तीमध्ये खालील विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे नाव | निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९४, भारतनगर अंतर्गत विविध ठिकाणी खडीकरण करणे. | रु.५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.९४, भारतनगर अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट रोड तयार करणे. | रु.५० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ३. | वॉर्ड क्र.९४, भारतनगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.५० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४, गजानननगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| जुने कामाचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९४, मनपा शाळा दुरूस्ती करणे.<br>SCR-Zone-06 P.No.23, Sr.No.02 (र.रु.10 लक्ष) | १. वॉर्ड क्र.९४, भारतनगर मध्ये खडीकरण करणे. (र.रु.१० लक्ष) |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४, गजानननगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामाचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९४, मनपा शाळा दुरूस्ती करणे.<br>SCR-Zone-06 P.No.23, Sr.No.02 (र.रु.10 लक्ष) | १. वॉर्ड क्र.९४, भारतनगर मध्ये खडीकरण करणे. (र.रु.१० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शेख फेरोज शेख बाबु रा.गल्ली नं A-१३ संजयनगर बायजीपुरा औरंगाबाद येथील रहिवासी दिनांक २९.०५.२०१८ रोजी यांचे घराला अचानक आग लागली. या अग्नी कांडामुळे यांचे संपुर्ण घरामधील बहुतांश वस्तु आगीच्या भक्षस्थानी पडल्या. ही वसाहत स्लम असुन रस्ते छोटे असल्या कारणाने फायर ब्रिगेडही त्या ठिकाणी पोहचु शकत नाही. त्यामुळे अग्नीकांडात कोणतीही वस्तु शिल्लक राहिली नाही. शेख फेरोज यांच्यावरच त्यांचे उदर निर्वाह मजुरी करुन कुटुंबाचे जीवन अवलंबुन आहे. शेख फेरोज कुटुंबात त्यांची पत्नी, त्यांचा लहान मुलगा व त्यांची लहान मुलगी असे कुटुंब आहे. संपुर्ण कुटुंबाची दयनिय अवस्था झाली आहे. त्यांच्या या अवस्थेवर सहानुभूतीचा विचार करुन औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत कमीत कमी दोन लाखांची आर्थिक सहाय्यतेसाठी सहानुभुतीपुर्वक विचार करण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शेख समिना शेख इलियास

**अनुमोदक:-**श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी

मा.महापौर :सुचक उपस्थित नसल्याने विषय स्थगित.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**विषय क्रमांक ५९६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४७ राजाबाजार अंतर्गत तुळजाराम पतंगाच्या दुकानाच्या समोर मनपाची खुली जागा आहे. त्या जागेवर ०१ पोलिस चौकी कार्यान्वीत करणे अत्यंत गरजेचे असुन ह्या भागामध्ये वारंवार छोटे-मोठे दंगे होत असून हा भाग दंगलग्रस्त भाग आहे. तसेच मोतीकारंजा या भागामध्ये ही ०१ पोलिस चौकी कार्यान्वित करावी.

करीता मनपाच्या खुल्या जागेवर पोलिस चौकी तयार करण्यात यावी, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक**:-कु.यशश्री लक्ष्मीनारायण बाखरीया, श्री.विकास रतनलाल जैन

**अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

श्री.नासेर सिद्दीकी :पोलीस स्टेशन मार्फत मागणी केली पाहिजे. महापालिकेने मागणी करणे योग्य आहे काय?

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४७ राजाबाजार अंतर्गत तुळजाराम पतंगाच्या दुकानाच्या समोर मनपाची खुल्या जागेवर ०१ पोलिस चौकी तसेच मोतीकारंजा या भागामध्येही ०१ पोलिस चौकी तयार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५९७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सद्यपरिस्थीती मध्ये संपुर्ण महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणाची मागणी शहरामध्ये सुरु असुन विविध ठिकाणी आंदोलने व मोर्चे चालु असुन श्री.प्रमोद जयसिंग होरे (पाटील) आरक्षणासाठी मागणी करतांना त्यांनी दुर्देवी आत्महत्या केली. तो त्यांच्या घरातील कर्ता पुरुष असुन त्यांना एक मुलगा, एक मुलगी, पत्नी, आई, वडील, भाऊ असा त्यांचा परिवार आहे. त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह संपुर्णपणे त्यांच्यावर अवलंबुन असुन त्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत म्हणुन मनपा प्रशासनाकडुन रक्कम रुपये २५ लक्ष रुपये देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर

**सुचक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप, श्री.मनोज बन्सीलाल गांगवे, श्री.विकास रतनलाल जैन

**अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप.

मा.महापौर :र.रु.२५ लक्ष ऐवजी र.रु.१० लक्ष देण्यात यावे. विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.प्रमोद जयसिंग होरे (पाटील) यांनी मराठा आरक्षण आंदोलना दरम्यान आत्महत्या केली. त्यांच्या कुटुंबीयांना महानगरपालिकेकडून र.रु.१० लक्ष आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ५९८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्पामध्ये वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत असलेल्या विकास कामांच्या लेखाशिर्ष खालील प्रमाणे बदलण्यात यावे.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर दुर्गामाता मंदिराजवळ भव्य सभागृह बांधणे. (र.रु.२५ लक्ष) | वॉर्ड क्र.९४ भारतनगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. (र.रु.२५ लक्ष) |
| २. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर बौध्द विहाराजवळ भव्य सभागृह बांधणे. (र.रु.२५ लक्ष)<br>SCR-Zone-06 P.No.24, (र.रु.५० लक्ष) | वॉर्ड क्र.९४ हनुमान नगर येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. (र.रु.२५ लक्ष) |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत असलेल्या खालील प्रमाणे विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर दुर्गामाता मंदिराजवळ भव्य सभागृह बांधणे. (र.रु.२५ लक्ष) | वॉर्ड क्र.९४ भारतनगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. (र.रु.२५ लक्ष) |
| २. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर बौध्द विहाराजवळ भव्य सभागृह बांधणे. (र.रु.२५ लक्ष) SCR-Zone-06 P.No.24, (र.रु.५० लक्ष) | वॉर्ड क्र.९४ हनुमान नगर येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. (र.रु.२५ लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ५९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव भागात मोठ्या प्रमाणात दलित वस्ती असून या भागात हातावर काम करणारे नागरीक मोठ्या प्रमाणात राहतात. या नागरीकांना मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देणेसाठी खालील कामे करणे आवश्यक आहे. करीता, नागरीकांचे सोईसाठी दलित वस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत खालील कामे करणेसाठी प्रस्ताव मंजुर करावा.

| अ.क्र. | कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सैलानीनगर व गणेशनगर, भिमसंदेश कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे. तसेच मुख्य रस्त्यावरून गणेशनगर भिमसंदेश कॉलनीकडे येणाऱ्या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे | १.०० कोटी |
| २. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सावित्रीबाई फुलेनगर मध्ये जाण्यासाठी पुल बांधणे तसेच विविध ठिकाणी डांबरी रस्ते करणे | २५.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते करणे. | ५०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी व पडेगाव गावठाण येथे विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे | ७५.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गावठाण येथे पाण्याची टाकी बांधणे | ०१ कोटी |
| ६. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत शिवपुरी या भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ते करणे | २५.०० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत शिवपुरी येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे | २५.०० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामे करणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सैलानीनगर व गणेशनगर, भिमसंदेश कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे. तसेच मुख्य रस्त्यावरून गणेशनगर भिमसंदेश कॉलनीकडे येणाऱ्या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे | १.०० कोटी |
| २. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सावित्रीबाई फुलेनगर मध्ये जाण्यासाठी पुल | २५.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | बांधणे तसेच विविध ठिकाणी डांबरी रस्ते करणे | |
| ३. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते करणे. | ५०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत माजी सैनिक कॉलनी व पडेगाव गावठाण येथे विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे | ७५.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गावठाण येथे पाण्याची टाकी बांधणे | ०१ कोटी |
| ६. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत शिवपुरी या भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ते करणे | २५.०० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत शिवपुरी येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे | २५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत मोठ्या प्रमाणात अल्पसंख्यांक नागरीक राहतात. तसेच या भागात हातावर काम करणारे व मोलमजुरी करणारे नागरीकही मोठ्या प्रमाणात राहतात. या नागरीकांना मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खालील कामे करणे आवश्यक आहे. करीता नागरीकांच्या सोईसाठी अल्पसंख्यांक लेखाशिर्ष अंतर्गत खालील कामे करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत अन्सार कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | ६०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत मिसबाह कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | ३०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत न्यु अन्सार कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ६०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत न्यु अन्सार कॉलनी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे | ५०.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत न्यु अन्सार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत मिसबाह कॉलनी येथे डांबरी रस्ता तयार करणे | ३०.०० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सरोज शाळा समोरील कॉलनीमध्ये शादीखाना बांधणे | २०.०० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कासमबरी दर्गा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १.०० कोटी |
| ९. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गट नंबर ९० शालीमार कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | ५०.०० लक्ष |
| १०. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गट नंबर ९१ शाहीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ५०.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव येथे अल्पसंख्यांक लेखाशिर्ष अंतर्गत खालील विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत अन्सार कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | ६०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत मिसबाह कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | ३०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत न्यु अन्सार कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ६०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत न्यु अन्सार कॉलनी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे | ५०.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत न्यु अन्सार कॉलनी येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | ५०.०० लक्ष |
| ६. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत मिसबाह कॉलनी येथे डांबरी रस्ता तयार करणे | ३०.०० लक्ष |
| ७. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सरोज शाळा समोरील कॉलनीमध्ये शादीखाना बांधणे | २०.०० लक्ष |
| ८. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कासमबरी दर्गा येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १.०० कोटी |
| ९. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गट नंबर ९० शालीमार कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | ५०.०० लक्ष |
| १०. | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गट नंबर ९१ शाहीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे | ५०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ पडेगाव येथील नागरीकांच्या सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

करीता खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पान क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामांचे नाव | अ.प.र.र. |
|---|---|---|---|
| Zone No.01 Spill P.No.5, Sr.No.17 | वॉर्ड क्र.१४ अंतर्गत पडेगाव येथील सार्वजनिक विहिरीतील गाळ काढणे विहिरीची दुरूस्ती करणे व विहिरीस आरसीसी संरक्षीत भिंत बांधणे. तरतुद र.रु.२२०.०० लक्ष | वॉर्ड क्र.१४ माजी सैनिक कॉलनी येथील सार्वजनिक विहिरी मधील गाळ काढणे विहिरीची दुरूस्ती करणे व विहिरीस आरसीसी संरक्षीत भींत बांधणे | २२०.०० लक्ष |
| Zone No.01 Spill P.No.15, Sr.No.99 | वॉर्ड क्र.१४ पडेगाव येथील मिसबाह कॉलनी येथील रजीया मस्जिद जवळ कॉंक्रीटींग करणे. तरतुद र.रु.१५.०० लक्ष | वॉर्ड क्र.१४, पडेगाव मिसबाह कॉलनी रजिया मस्जिद जवळ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १५.०० लक्ष |
| Zone No.01 Spill P.No.1, Sr.No.5 | वॉर्ड क्र.१४ पडेगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासाठी आरसीसी स्लॅब टाकणे व इतर कामे करणे. तरतुद र.रु.३.४० लक्ष | वॉर्ड क्र.१४ येथील गौतम बुध्द पुतळ्याच्या बाजूला कंपाऊंड वॉल बांधणे | ३.४० लक्ष |

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजी शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४ पडेगाव खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पान क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामांचे नाव | अ.प.र.र. |
|---|---|---|---|
| Zone No.01 Spill P.No.5, Sr.No.17 | वॉर्ड क्र.१४ अंतर्गत पडेगाव येथील सार्वजनिक विहिरीतील गाळ काढणे विहिरीची दुरूस्ती करणे व विहिरीस आरसीसी संरक्षीत भिंत बांधणे. तरतुद र.रु.२२०.०० लक्ष | वॉर्ड क्र.१४ माजी सैनिक कॉलनी येथील सार्वजनिक विहिरी मधील गाळ काढणे विहिरीची दुरूस्ती करणे व विहिरीस आरसीसी संरक्षीत भींत बांधणे | २२०.०० लक्ष |
| Zone No.01 Spill P.No.15, Sr.No.99 | वॉर्ड क्र.१४ पडेगाव येथील मिसबाह कॉलनी येथील रजीया मस्जिद जवळ कॉंक्रीटींग करणे. तरतुद र.रु.१५.०० लक्ष | वॉर्ड क्र.१४, पडेगाव मिसबाह कॉलनी रजिया मस्जिद जवळ विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | १५.०० लक्ष |
| Zone No.01 Spill P.No.1, Sr.No.5 | वॉर्ड क्र.१४ पडेगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासाठी आरसीसी स्लॅब टाकणे व इतर कामे करणे. तरतुद र.रु.३.४० लक्ष | वॉर्ड क्र.१४ येथील गौतम बुध्द पुतळ्याच्या बाजूला कंपाऊंड वॉल बांधणे | ३.४० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा:-**

श्री.राजू शिंदे :चिकलठाणा येथे जो कचरा टाकतो तेथे जाणेसाठी शेतक-याच्या मालातून महापालिकेच्या गाडया जात आहे काही शेतक-याचे नुकसान झाले आहे. पंचनामा करून पाठविले आहे.१५-१६ लोक आहे २२ ते २३ हजारची मागणी केली आहे. ६ कि.मी रस्ता जाण्यासाठी कमी होईल डिझेल व इतर खर्च वाचेल.तो प्रस्ताव घ्यावा.

मा.महापौर : प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.हा विषय मंजूर

**विषय क्रमांक ६०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४, पडेगाव येथील नागरीकांच्या सोईसाठी नाविन्यपूर्ण योजना या लेखाशिर्षा अंतर्गत खालील कामे करणे आवश्यक असून खालील कामे करणेसाठी रक्कम रुपये ०७.०० कोटी निधीची आवश्यकता आहे. करीता र.रु.०७.०० कोटीची तरतुद उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे |
| २ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. |
| ३ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी पोलसह पथदिवे बसविणे |
| ४ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे. |
| ५ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सभागृह बांधणे. |

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४, पडेगाव येथे नाविन्यपूर्ण योजना या लेखाशिर्षा अंतर्गत खालील कामे करणेसाठी र.रु.०७.०० कोटीची तरतुद उपलब्ध होणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे |
| २ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. |
| ३ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी पोलसह पथदिवे बसविणे |
| ४ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विविध ठिकाणी पिण्याचे पाण्याची पाईप लाईन टाकणे. |
| ५ | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सभागृह बांधणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरात बऱ्याच भागात स्वच्छतागृह नसल्याने शहरातील नागरीकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. नागरीकांची गैरसोय दुर होणे करीता शहरात विविध ठिकाणी पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधल्यास नागरीकांची होणारी गैरसोय दुर होईल.

करीता खालील ठिकाणी पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | पैठणगेट येथील मनपा पार्कींग जवळ पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| २. | सिडको बसस्टॅण्ड भागात पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| ३. | बाबा पेट्रोल पंप समोरील ट्रॅफिक पोलिस चौकीचे बाजुला पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| ४. | पडेगाव येथील स्मशानभुमी लगत पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| ५. | पडेगाव येथील चिनार गार्डनच्या बाजुला औरंगाबाद मुंबई हायवे येथे पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| ६. | रेल्वेस्टेशन परिसर येथे पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात विविध ठिकाणी पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | पैठणगेट येथील मनपा पार्कींग जवळ पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| २. | सिडको बसस्टॅण्ड भागात पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| ३. | बाबा पेट्रोल पंप समोरील ट्रॅफिक पोलिस चौकीचे बाजुला पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| ४. | पडेगाव येथील स्मशानभुमी लगत पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |
| ५. | पडेगाव येथील चिनार गार्डनच्या बाजुला औरंगाबाद मुंबई हायवे येथे पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |

| | |
|---|---|
| ६. | रेल्वेस्टेशन परिसर येथे पे ॲण्ड युज धर्तीवर स्वच्छतागृह बांधणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत नागरीकांच्या सोईसाठी खालील कामे करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलुन तरतुद वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./पान क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|---|
| Ward No.01-Spill P.No.3, Sr.No.5 | १. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कत्तलखाना परिसरातील रस्त्याची दुरुस्ती करणे. तरतुद र.रु.१०.०० लक्ष | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गट नं.६३, पडेगाव दक्षता कॉलनी या ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे. | २०.०० लक्ष |
| Ward No.01-Spill P.No.3, Sr.No.4 | २. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कत्तलखाना परिसरातील रस्त्याची दुरुस्ती करणे. तरतुद र.रु.२०.०० लक्ष | | |

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१४, पडेगाव येथे खालील कामे करणेसाठी लेखाशिर्ष बदलुन तरतुद वळती करणेस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./पान क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव | अं.प.रक्कम |
|---|---|---|---|
| Ward No.01-Spill P.No.3, Sr.No.5 | १. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कत्तलखाना परिसरातील रस्त्याची दुरुस्ती करणे. तरतुद र.रु.१०.०० लक्ष | वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत गट नं.६३, पडेगाव दक्षता कॉलनी या ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे. | २०.०० लक्ष |
| Ward No.01-Spill P.No.3, Sr.No.4 | २. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत कत्तलखाना परिसरातील रस्त्याची दुरुस्ती करणे. तरतुद र.रु.२०.०० लक्ष | | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.७२ क्रांतीचौक करीता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR-Zone-09 P.No.38 | १० | प्रभाग क्र.७२ मध्ये विविध भागात कॉंक्रीटची कामे करणे र.रु.१ कोटी पैकी रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.७२ पन्नालालनगर व इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्त करणे. रु.१० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शिल्पाराणी सागर वाडकर **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७२ क्रांतीचौक येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| SCR-Zone-09 P.No.38 | १० | प्रभाग क्र.७२ मध्ये विविध भागात कॉंक्रीटची कामे करणे र.रु.१ कोटी पैकी रु.२० लक्ष | वॉर्ड क्र.७२ पन्नालालनगर व इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्त करणे. रु.१० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८१, ठाकरेनगर या प्रभागांतर्गत येणाऱ्या चिंतामणी अपार्टमेंट ते छत्रपती शिवाजी क्रिडा मैदान या मुख्य रस्त्यास "शशीकला त्र्यंबक महाजन मार्ग" असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून या रस्त्यास "शशीकला त्र्यंबक महाजन मार्ग" असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे

**अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.जगताप कमलाकर शामराव, श्रीमती कमल रामचंद्र नरोटे, श्रीमती विमल गोविंद केंद्रे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८१, ठाकरेनगर मधील चिंतामणी अपार्टमेंट ते छत्रपती शिवाजी क्रिडा मैदान या मुख्य रस्त्यास "शशीकला त्र्यंबक महाजन मार्ग" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८१ ते प्रभाग क्रमांक-८४ या प्रभागांतर्गत येणाऱ्या महालक्ष्मीचौक ते सोहम मोटर्स या मुख्य रस्त्यास "दादासाहेब दशरथराव दानवे पाटील मार्ग" असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून या रस्त्यास "दादासाहेब दशरथराव दानवे पाटील मार्ग" असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे

**अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.जगताप कमलाकर शामराव, श्रीमती कमल रामचंद्र नरोटे, श्रीमती विमल गोविंद केंद्रे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८१ ते प्रभाग क्रमांक-८४ या प्रभागांतर्गत येणाऱ्या महालक्ष्मीचौक ते सोहम मोटर्स या मुख्य रस्त्यास "दादासाहेब दशरथराव दानवे पाटील मार्ग" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८१, ठाकरेनगर या प्रभागांतर्गत येणाऱ्या कामगार चौक ते महालक्ष्मी चौक या मुख्य रस्त्यास "कै.यशवंतराव चव्हाण मार्ग" असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. कै.यशवंतराव चव्हाण यांचे महान कार्य लक्षात घेता

शहरातील नागरीकांना त्यांच्या कार्याची माहिती व्हावी यासाठी या रस्त्यास "कै.यशवंतराव चव्हाण मार्ग" असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे

**अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.जगताप कमलाकर शामराव, श्रीमती कमल रामचंद्र नरोटे, श्रीमती विमल गोविंद केंद्रे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८१, ठाकरेनगर या प्रभागांतर्गत येणाऱ्या कामगार चौक ते महालक्ष्मी चौक या मुख्य रस्त्यास "कै.यशवंतराव चव्हाण मार्ग" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६०९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मध्यंतरी औरंगाबाद शहरात उसळलेल्या दंगलीत माझ्या वार्डातील तरुण युवक नामे हारेस हारुन काद्री हा आपल्या लहान भावास शोधत असतांना शोधता-शोधता अचानक तो रस्त्यावर आल्याने त्याला पोलिसांनी झाडलेली गोळी लागुन मृत्यु झालेला आहे.

करिता माझे वार्ड क्र. ४६ मधील नवाबपुरा चौकास स्व.हारेस हारुन काद्री चौक असे नाव देण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान फेरोज मोईनोद्दीन **अनुमोदक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

श्री.प्रमोद राठोड :यात म्हटले की पोलिसांनी झाडलेली गोळी लागुन मृत्यू झालेला आहे हे कितपत योग्य आहे. तसेच या चौकास दिनांक १८.१०.२013 मध्ये पत्रकार स्व.शहीद मंहमद खलीउल्लाखान यांचे नाव देण्यात आले होते. त्या वार्डाचे नगरसेवक बदलले म्हणजे चौकाचे नाव बदलता येते का? शहानिशा केली पाहिजे. पुर्वी नाव दिलेले असेल तर त्या ठिकाणी बोर्ड लावले पाहिजे.

मा.महापौर :यापुर्वी जे नाव दिले त्याची अमलबजावणी करावी. हा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

श्री.त्र्यंबक तुपे :भगवान महावीर उड्डाणपूलाचे नामफलक अद्याप लावला नाही.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावानुसार पुर्वीचे जे नाव दिलेले आहे, त्याची अंमलबजावणी करावी. हा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्रमांक ६१०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११५, सातारा येथील गट नंबर-९३, तंत्रज्ञनगर येथील मोकळ्या जागेतील (ओपन जागा) उद्यानास नागरीकांची मागणीनुसार "पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर" असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११५, सातारा, गट नंबर-९३, तंत्रज्ञनगर येथील मोकळ्या जागेतील (ओपन जागा) उद्यानास "पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्पामध्ये वॉर्ड क्र.३, एकतानगर अंतर्गत असलेल्या विकास कामांचा लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यात यावा.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.३ एकतानगर अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. SCR-Zone-04 P.No.13 Sr.No.4 (र.रु.२५ लक्ष). | वॉर्ड क्र.३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीट रस्ते करणे. (र.रु.२५ लक्ष) |
| २. | वॉर्ड क्र.३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन पोलसहित पथदिवे बसविणे. SCR-Zone-04 P.No.15 Sr.No.01 (र.रु.२५ लक्ष). | वॉर्ड क्र.३ अंतर्गत विविध गल्ल्यांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्ते करणे. (र.रु.२५ लक्ष) |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे **अनुमोदक:-**श्री.राजगौरव हरिदास वानखेडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३, एकतानगर येथे खालील विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.३ एकतानगर अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. SCR-Zone-04 P.No.13 Sr.No.4 (र.रु.२५ लक्ष). | वॉर्ड क्र.३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रीट रस्ते करणे.(र.रु.२५ लक्ष) |
| २. | वॉर्ड क्र.३ एकतानगर अंतर्गत विविध ठिकाणी नवीन पोलसहित पथदिवे बसविणे. SCR-Zone-04 P.No.15 Sr.No.01 (र.रु.२५ लक्ष). | वॉर्ड क्र.३ अंतर्गत विविध गल्ल्यांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्ते करणे. (र.रु.२५ लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी हा वॉर्ड ८० टक्क्यापेक्षा जास्त दलित वस्ती असून येथे महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत मिसरवाडी येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्याकरीता र.रु.५० लक्षचा निधी व मिसरवाडी येथे सिमेंट रस्ता करण्याकरीता रु.५० लक्ष असे एकूण रु.१ कोटी निधी उपलब्ध होणेकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरैशी **अनुमोदक:-**श्रीमती मलेका बेगम हबीब कुरेशी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथील दलित वसाहतींमध्ये महाराष्ट्र शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकण्याकरीता र.रु.५० व सिमेंट रस्ता करण्याकरीता रु.५० लक्ष असे एकूण रु.१ कोटीचा निधी उपलब्ध होणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे अरिहंत ट्रेडर्स ते सनी सेंटरच्या कम्युनिटी हॉल पर्यंत मुख्य डी.पी.रस्ता असून तो रहदारीचा मुख्य रस्ता आहे. या रस्त्याची कामे

करण्याची नागरीकांची नेहमी मागणी आहे. तेव्हा या डी.पी.रस्त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सर्वसाधारण रस्ता अनुदान या योजनेच्या सन २०१७-१८ या वर्षाच्या प्राप्त अनुदानातून रु.५० लक्षचा निधी सदरील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याकरीता मिळावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शबनम बेगम कलीम कुरैशी **अनुमोदक:-**श्रीमती मलेका बेगम हबीब कुरेशी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३३, मिसरवाडी येथे अरिहंत ट्रेडर्स ते सनी सेंटरच्या कम्युनिटी हॉल पर्यंत मुख्य डी.पी. रस्त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सर्वसाधारण रस्ता अनुदान या योजनेच्या सन २०१७-१८ या वर्षाच्या प्राप्त अनुदानातून रु.५० लक्षचा निधी सदरील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याकरीता उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती जयश्री माणिकराव शेळके, स.शि.जि.प.प्रा.शाळा बहुलखेडा केंद्र, जरंडी, ता.सोयगाव, जि.औरंगाबाद येथे कार्यरत असून त्या औरंगाबाद येथे स्थायीक आहेत. त्यांची मुले लहान असून मुलांचे शिक्षण औरंगाबाद येथे सुरु असल्याने त्यांना नियोजीत शाळेत जाणे-येणे तसेच मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देणे अत्यंत कठीण होत असल्याने त्यांची बदली आंतरजिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेत रिक्त पदावर करणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नितीन रमन चित्ते **अनुमोदक:-**श्रीमती पुष्पा उत्तमराव रोजतकर

मा.महापौर : ५८६, ५८७ वर जो निर्णय दिला त्यानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या बाबत धोरण निश्चित करणे सुचना मांडली. रिक्त जागा किती आहे? किती आवश्यकता आहे? मा.आयुक्तांनी सर्व बाबी तपासून घ्याव्यात व प्रशासनाने धोरण ठरवून निर्णय घ्यावा. यापुर्वीच्या प्रकरणाच्या बाबतीत सुध्दा जे धोरण ठरविले जाईल त्यानुसार आवश्यक ती नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ६१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या औरंगाबाद शहरात विविध क्षेत्रात महिलांच्या नोकरीचे प्रमाण पुणे-मुंबई शहराप्रमाणेच जास्त झाले आहे. शहरातील महिला विविध कंपन्या व इतर ठिकाणी नोकरी तसेच शिक्षणासाठी जात येत असतात. त्यामुळे शहरातील त्यांचे जीवन देखिल धावपळीचे व धकाधकीचे झाले आहे. यासाठी महिलांची व मुलींची शारिरीक क्षमता वाढावी यासाठी शहरात महिला व मुलींसाठी व्यायामशाळा असणे अत्यावश्यक झाले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे बऱ्याच महिला जिममध्ये जाऊ शकत नाही. अशा महिलांसाठी व मुलींसाठी महानगरपालिकेतर्फे प्रत्येक प्रभागात महानगरपालिकेच्या अथवा शासकीय जागेवर सुसज्ज अशी व्यायामशाळा बांधण्यात याव्यात. या व्यायामशाळेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणी न करता सर्व महिलांना व मुलींना मोफत सुविधा देण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

**अनुमोदक:-**श्रीमती शिल्पाराणी सागर वाडकर, श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर

श्रीमती माधुरी देशमुख :महिला व बाल समितीच्या सभेमध्ये जे निर्णय होतात त्यास कायदेशीर मान्यता असते का? समिती बनते तेव्हा त्यास कायदेशीर मान्यता आहे.

मा.महापौर :या समितीसाठी वेगळा निधी आहे. निर्णय घेण्याचे अधिकार समितीला आहे कार्यवाही करण्याचे अधिकार प्रशासनाला आहे. प्रशासनाने कार्यवाही का केली नाही.हा प्रश्न येतो.

श्रीमती माधुरी देशमुख :२१ जून २०१८ ला समीतीची बैठक झाली. त्यात महिलांसाठी, विदयार्थ्यासाठी स्वतंत्र वाचनालय उभारणे ठराव घेतला त्याची अंमलबजावणी का होत नाही?

मा.महापौर :यात महिला व बाल कल्याण समितीचे सदस्या सुचक व अनुमोदक म्हणून असतील. धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला आहे.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महिलांची व मुलींची शारिरीक क्षमता वाढावी यासाठी शहरात महिला व मुलींसाठी व्यायामशाळा असणे अत्यावश्यक असल्याने व आर्थिक परिस्थितीमुळे बऱ्याच महिला जिममध्ये जाऊ शकत नाही. अशा महिलांसाठी व मुलींसाठी महानगरपालिकेतर्फे प्रत्येक प्रभागात महानगरपालिकेच्या अथवा शासकीय जागेवर सुसज्ज अशी व्यायामशाळा बांधण्यास व या व्यायामशाळेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणी न करता सर्व महिलांना व मुलींना मोफत सुविधा देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे शहरात साधारणत: २१ वाचनालये आहेत. या वाचनालयापैकी शहरातील महिला व मुलींसाठी योग्य असे दोनच वाचनालय महानगरपालिकेचे आहेत. त्यामुळे बहुतांश प्रभागातील महिला व मुलींना या वाचनालयाचा लाभ घेता येत नाही. शहरात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढावे तसेच त्यांच्या वाचनाची गोडी निर्माण व्हावी, गरजु महिला व मुलींना स्पर्धा परिक्षेची तयारी करता यावी यासाठी प्रत्येक वॉर्डात महिला व मुलींसाठी स्वतंत्र वाचनालय महानगरपालिकेच्या अथवा शासकीय जागेत किंवा भाडेपट्टयावर जागा घेवून सुरु करण्यात यावे तसेच या वाचनालयात स्पर्धा परिक्षेची सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करून देण्यासह सुसज्ज वाचनालय सुरु करणे तसेच या वाचनालयासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता ही सुविधा सर्व महिला व मुलींना मोफत उपलब्ध करून देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

**अनुमोदक:-**श्रीमती शिल्पाराणी सागर वाडकर, श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेचे प्रत्येक वॉर्डात महिला व मुलींसाठी स्वतंत्र वाचनालय महानगरपालिकेच्या अथवा शासकीय जागेत किंवा भाडेपट्टयावर जागा घेवून सुरु करण्यास तसेच या वाचनालयात स्पर्धा परिक्षेची सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करून देण्यासह सुसज्ज वाचनालय सुरु करणे तसेच या वाचनालयासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता ही सुविधा सर्व महिला व मुलींना मोफत उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती सुमय्या खातुन अब्दुल अजीज प्रा.शिक्षिका भिवंडी महानगरपालिका हयांचे लग्न औरंगाबाद चेलीपुरा रहिवासी श्री.मिर्झा अहेमद बेग यांच्याशी झालेला आहे. संबंधीतांच्या सासु ह्या वयोवृध्द असुन विविध आजाराने त्या नेहमी आजारी असतात. तसेच त्यांना ७ वर्षाची मुलगी व ३ वर्षाचा मुलगा आहे. त्यामुळे त्यांना येण्या-जाण्यासही फार त्रास होत असतो. संबंधीतांनी भिवंडी महानगरपालिकेत औरंगाबाद महानगरपालिकेत बदलीसाठी विनंती अर्ज केलेला

होता. संबंधीत महानगरपालिकेने त्यांना सोडण्याची तयारी दर्शविल्याचे पत्र क्र.७९१ दिनांक १६.०७.२०१८ दिलेले आहे.

करीता याबाबत सहानुभूतीपुर्वक विचार करून जिल्हा परिषद शिक्षिकेला नगरपालिका, नगरपरिषद किंवा महानगरपालिकेमध्ये वर्ग करण्याबाबतचा महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.२८०/आस्था-९ दिनांक २९ जुन २०१७ अन्वये दोन्ही विभागात परस्पर सहमती होत असेल तर अर्जदारास कार्यमुक्त करता येईल. अशी तरतुद असल्याने श्रीमती सुमय्या खातुन अब्दुल अजीज प्रा.शाळा यांची सेवा भिवंडी महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेत सेवेत सामावून घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अजीम अहेमद खान **अनुमोदक:-**श्री.सय्यद मतीन रशीद

मा.महापौर :विषय मंजुर

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती सुमय्या खातुन अब्दुल अजीज प्रा.शिक्षिका भिवंडी महानगरपालिका यांना आंतरजिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६१८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८६, रामनगर परिसरात कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तसेच विद्युतीकरण व इतर विकास कामे करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत र.रु.५.०० कोटीचा निधी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे

**अनुमोदक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे, श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८६, रामनगर परिसरात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तसेच विद्युतीकरण व इतर विकास कामे करण्यासाठी र.रु.५.०० कोटीचा निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६१९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३७ मधील मयत मराठा तरुण उमेश आसाराम ईडाईत या उच्च शिक्षीत तरुणाने बेरोजगारीला कंटाळून तसेच मराठा आरक्षण न मिळाल्यामुळे गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तरी या तरुणाच्या कुटूंबीयांना महानगरपालिकेतर्फे र.रु.५ लक्ष एवढी आर्थिक मदत करण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती वैशाली कारभारी जाधव

**अनुमोदक:-** श्री.राजु रामराव शिंदे, श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके,

मा.उपमहापौर :यापुर्वी रु.१० लक्षची मदत करण्यात आलेली आहे. तरी सर्वांना सारखी आर्थिक मदत करण्यात यावी.

मा.भाऊसाहेब जगताप :सर्वांना सारखीच मदत द्यावी.

मा.बापु घडमोडे :इतरांप्रमाणे यांना देखील १० लक्ष मदत देण्यात यावी.

मा.महापौर :प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुर.र.रु.१० लक्ष आर्थिक मदत करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनांनुसार वॉर्ड क्र.३७ मधील उच्च शिक्षीत तरुणाने बेरोजगारीला कंटाळून मराठा आरक्षण आंदोलना दरम्यान उमेश आसाराम ईडाईत या तरुणाने दुर्दैवी आत्महत्या केली त्याच्या कुटूंबीयांस महानगरपालिकेतर्फे र.रु.१० लक्षची आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरामध्ये विविध ठिकाणी महापुरुषांच्या नावे संशोधन केंद्र उभारणे, स्मारक उभारणे यासाठी वेळोवेळी मागणी नागरीकांकडून करण्यात येते. त्याप्रमाणे संशोधन केंद्र, पुतळा स्मारक उभारणी यासाठी भविष्यात महानगरपालिकेमार्फत खालील प्रमाणे कामे हाती घ्यावयाचे आहेत. अशी काही प्रस्तावीत केलेली कामे खालील प्रमाणे आहेत.

०१. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र उभारणे.
०२. भगवान महावीर संशोधन केंद्र उभारणे.
०३. स्वामी विवेकानंद उद्यान, टी.व्ही. सेंटर येथे महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक व पुतळा उभारणे.
०४. स्वातंत्र्यवीर विनायक दामोधर सावरकर संशोधन केंद्र उभारणे.

तथापि, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदरील कामांसाठी निधी अपुरा पडत आहे. वरील कामासाठी शासनाने महानगरपालिकेस प्रत्येक रु.२ कोटी असे एकुण र.रु.८ कोटीचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी शासनाकडे करण्यात यावी. यासाठी प्रशासनामार्फत सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्री.नितीन रमन चित्ते

**अनुमोदक:-**श्रीमती कमल रामचंद्र नरोटे, श्रीमती ज्योती सुनील नाडे, श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी

| | |
|---|---|
| मा.महापौर | :या सर्वच कामासाठी एकत्रित आठ कोटीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणार आहोत. |
| उपमहापौर | :यात छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र असावे त्याचा यात समावेश करावा. |
| मा.महापौर | :दुरूस्ती करण्यात येते, रु.२ कोटी आणखी तरतूद करण्यासह प्रस्ताव पाठविण्यात यावा. त्वरीत कार्यवाही करावी. |
| श्री.कचरू घोडके | :संत गाडगे महाराज संशोधन केंद्र असावे. |
| श्रीमती किर्ती शिंदे | :विद्येची खरी देवता सावित्रीबाई फुले यांचा पुतळा औरंगपूरा येथे असावा. |
| श्री दिलीप थोरात | :महाराणा प्रताप यांचा पुतळा करण्यात यावा. |
| श्री.मनोज गांगवे | :संत रोहिदास महाराज संशोधन केंद्र असावे. |
| मा.महापौर | :प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेलेला आहे.जे जे पुतळयाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे असेल श्री.कोल्हे यांनी प्रशासनाच्या वतीने पाठपुरावा करावा.वसंतराव नाईक संशोधन केंद्र असावे त्यासाठी जागा निश्चित करावी. दुरूस्तीसह हा विषय मंजूर |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरामध्ये विविध ठिकाणी महापुरुषांच्या नावे संशोधन केंद्र उभारणे, स्मारक उभारणे यासाठी प्रस्तावीत केलेली कामे खालील प्रमाणे आहेत.

०१. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन केंद्र उभारणे.
०२. भगवान महावीर संशोधन केंद्र उभारणे.

०३. स्वामी विवेकानंद उद्यान, टी.व्ही. सेंटर येथे महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक व पुतळा उभारणे.

०४. स्वातंत्र्यवीर विनायक दामोधर सावरकर संशोधन केंद्र उभारणे. तसेच स.सदस्यांनी सुचविलेल्या नावाचेही संशोधन केंद्र उभारून सदरील कामासाठी शासनाने महानगरपालिकेस एकुण र.रु.८ कोटीचा व वाढीव आणखी रु.२ कोटीचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याकरीता प्रस्ताव शासनास पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-११३, भारतनगर, शिवाजीनगर परिसरातील दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी, ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तसेच गटार बांधणे आणि इतर विकास कामे करण्यासाठी र.रु.०५.०० कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड **अनुमोदक:-**श्री.जायभाय रमेश भानुदास

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-११३, भारतनगर, शिवाजीनगर येथील दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी, ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तसेच गटार बांधणे आणि इतर विकास कामे करण्यासाठी र.रु.०५.०० कोटीचा निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे एक ऐतिहासिक शहर म्हणून प्रसिध्द आहे. या शहरात विविध थोर पुरुषांचे स्मारके उभारण्यात आलेली आहेत. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी देशासाठी केलेले कार्य महान आहे. त्यांनी अंदमानच्या तुरुंगात भोगलेली काळ्या पाण्याची कठोर शिक्षा याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. स्वातंत्र्यासाठी त्यांनी दिलेल्या बलिदानाचे स्मरण स्थानिक रहिवाशी नागरीक तसेच युवक युवती याचेसह ऐतिहासिक शहरात येणाऱ्या पर्यटकांना व्हावे. या दृष्टीकोनातून त्यांचे भव्य संशोधन केंद्र हिंदुराष्ट्र चौक, एन-८ पाण्याच्या टाकीमागील जागेत किंवा बॉटनिकल गार्डन हिंदुराष्ट्र चौकातील जागेत बांधणे आणि या दृष्टीकोनातून संशोधन केंद्राचे अंदाजपत्रक तयार करणे व जागा निश्चित करणे करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

**अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी

श्री.रेणुकादास वैद्य :या विषयामध्ये दुरूस्ती सूचविण्यात येत आहे. या मध्ये संशोधन केंद्रासाठी एन-८ पाण्याच्या टाकीमागील जागेत किंवा बॉटनिकल गार्डन या जागेऐवजी हे संशोधन केंद्र सिडको सेक्टर एन-८, एफ (साखरे मंगल कार्यालया समोरील) या जागेवर करणे अशी दुरूस्ती करणे व यासाठी र.रु.२.०० कोटीची आर्थिक तरतुद तुर्तास करण्यात यावी.

मा.महापौर :दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे भव्य संशोधन केंद्र एन-८ पाण्याच्या टाकीमागील जागेत किंवा बॉटनिकल गार्डन या जागेऐवजी हे संशोधन केंद्र सिडको सेक्टर एन-८, एफ (साखरे मंगल कार्यालया समोरील) या जागेवर

करणेच्या दुरुस्तीसह व यासाठी र.रु.२.०० कोटीची आर्थिक तरतुद तुर्तास उपलब्ध करुन देणेसही मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती फरहत जहॉ अब्दुल शकुर, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पानेवाडी केंद्र, फुलंब्री, तालुका फुलंब्री ह्या सध्या येथे कार्यरत असून त्यांना लहान मुले आहेत. तसेच त्यांच्या सासू ह्या नेहमी आजारी राहतात. त्यांच्या औषधोपचाराची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतावर आहे. तसेच कामाच्या ठिकाणी कोणतेही वाहन जाण्याची व्यवस्था नसून शाळा ही डोंगरी भागात आहे. त्यामुळे महिलांना येण्या-जाण्यासही फार त्रास होत आहे. संबंधीतांनी त्यांची सेवा औरंगाबाद महानगरपालिकेत वर्ग करण्यासाठी मागणी केली असता, संबंधीत कार्यालयाने संमती दर्शविलेली आहे.

करीता, श्रीमती फरहत जहॉ अब्दुल शकुर, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पानेवाडी केंद्र, फुलंब्री, तालुका फुलंब्री ह्याची सेवा जिल्हा परिषदेतून औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती नरगीस सलीम शेख **अनुमोदक:-**श्री.जमीर अहेमद कादरी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती फरहत जहॉ अब्दुल शकुर, प्राथमिक शिक्षिका, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पानेवाडी केंद्र, फुलंब्री, तालुका फुलंब्री, जि.औरंगाबाद यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत समावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, तात्पुरते फलक, बॅनर्स इत्यादीच्या धोरणाचे सुसूत्रीकरणा बाबत प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरात रस्त्यावर, रस्त्याच्या कडेस, चौकात इत्यादी ठिकाणी अनधिकृत रित्या लावलेले झेंडे, पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीगमुळे शहराचे सौंदर्य, स्वच्छता, शांतता यासा बाधा निर्माण होत आहे. यासर्व जाहिराती संबंधाने महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्या करीता अधिनियम १९९५ तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मधील आदेश आहे. त्यानुसार महानगरपालिका, औरंगाबाद व पोलिस प्रशासन यांनी दिनांक २८.०७.२०१८ ते दिनांक ३१.०७.२०१८ पर्यंत संयुक्त मोहिम राबवून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत जाहिराती फलक हटविण्यात आले आहे.

२. शहरात परंपरेनुसार साजरे होणारे सण, महापुरूषांच्या जयंती, धार्मिक सण यावेळेस असे पोस्टर्स, बॅनर्स लावण्यात येतात. त्याबाबतीत तात्पुरती जाहिरात परवानगी देणे बाबत खालील प्रमाणे धोरण प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. खालील दिलेले अपवाद वगळून शहरात कोठेही तात्पुरत्या स्वरुपाचे बॅनर्स, फलक, पोस्टर्स, इत्यादी लावण्यास निर्बंध घालण्यात येत आहे.

ब. खालील नमुद महापुरुषांची जयंती व धार्मिक सणासाठीच तात्पुरती बॅनर्स, फलक लावण्याची परवानगी महानगरपालिकेतर्फे देण्यात येईल. तात्पुरती फलक, बॅनर्सची परवानगी उत्सवाच्या एक दिवस अगोदर व उत्सवाच्या दिवशी अशी दोन दिवसासाठीच असेल.

| अ.क्र. | धार्मिक उत्सव व महापुरुषांची जयंती | दिनांक |
|---|---|---|
| १. | सावित्रीबाई फुले जयंती | ०३ जानेवारी |
| २. | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी |
| ३. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १८ फेब्रुवारी |

| | | |
|---|---|---|
| ४. | संत गाडगेबाबा महाराज जयंती | २३ मार्च |
| ५. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल |
| ६. | राजर्षी शाहु महाराज जयंती | २६ जुन |
| ७. | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | ०१ ऑगस्ट |
| ८. | भारत स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट |
| ९. | महावीर जयंती | ---- |
| १०. | बकरी ईद | ---- |
| ११. | रमजान ईद | ---- |
| १२. | गणपती उत्सव | ---- |
| १३. | दसरा व नवरात्री | ---- |
| १४. | दिवाळी | ---- |
| १५. | महापरिनिर्वाण दिन | ०६ डिसेंबर |
| १६. | गुरुनानक जयंती | ---- |
| १७. | ख्रिसमस/नाताळ | २५ डिसेंबर |

क. वरील यादीतील दिवसांच्या सणासाठी जाहिरात लावणेसाठी मा.उच्च न्यायालयाचे ०९ मीटर ते ४५ मीटर रस्त्यातील बोर्ड, बॅनर्स, फलक बाबतचे आदेशाचे अवमान होणार नाही या अटीस राहून प्रती चौ.फुट रु.५.५०/- दराने जास्ती जास्त आकार १० X १२ चौ.फुट पेक्षा नसावा व फलकाची उंची जमीनीपासून व ३ मीटरपेक्षा कमी नसावी.

ड. बॅनर्स, फलक लावण्यापुर्वी पोलिस प्रशासनाने ना-हरकत आणि महानगरपालिकेची विहित परवानगी घेऊन, जाहिरात कर अदा करून वरील नमुद दिवशीच पोस्टर्स, बॅनर्स लावता येईल.

इ. बॅनर्स, फलक याबाबतची परवानगी महानगरपालिका मुख्यालयातूनच देण्यात यईल. प्रभाग स्तरावर देण्यात येणार नाही.

ई. परवानगीची मुदत संपताच जाहिराती काढून घेण्याची जबाबदारी परवानगी धारकांवर राहील. अन्यथा ते फलक अनधिकृत गृहीत धरून महानगरपालिकेमार्फत हटवून घेण्यात यईल व त्यावर पोलिसात गुन्हे दाखल करणेची कार्यवाही महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ तसेच मा.उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मधील आदेशान्वये कार्यवाही पात्र राहील.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.राजू शिंदे :भगवान गौतम बुध्द जयंती व संभाजी महाराज जयंती तसेच वंसतराव नाईक यांची जयंतीच्या वेळेत नामफलक लावण्याचा समावेश करावा.

श्री.त्र्यंबक तुपे :नेमके मा.कोर्टाचे या बाबतीत काय म्हणणे आहे? यात १७ नावे दिली आहे. जे थोर पुरूष आहे. ज्यांनी महाराष्ट्रासाठी चांगले काम केले. थोर संत आहे थोर समाज सुधारक आहे. महापुरूष होऊन गेले. सर्वांचा विचार करावा. यात भगवान परशुराम यांची जयंती श्रीकृष्ण जयंती, हिन्दु-ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती, छत्रपती संभाजी महाराज जयंती, मा.उध्दवजी ठाकरे साहेब यांचे वाढदिवस तसेच इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांचे वाढदिवस, छत्रपती शिवाजी महाराज जयंती तिथीनुसार या वेळेसही होर्डींग लावण्याचा समावेश असावा.

श्री.अजीम अहेमद :यात ईद-ए-मिलाद, मोहरम् या दिवशीचा उत्सव यात समाविष्ट करावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :यात राजीव गांधी, इंदिरा गांधी जयंती निमित्ताने नामफलक लावण्यासाठी ॲड करावे.

मा.महापौर :शहरामध्ये तात्पुरत्या स्वरूपात बॅनर्स, फलक लावण्या बाबत धोरण ठरविण्या बाबत प्रस्ताव आहे. सदस्यांनी सुचना केल्या यात स्व.बाळासाहेब ठाकरे यांची २३ जानेवारीला यांची जयंती आहे. त्यांचाही समावेश करण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराज यांची मराठी तिथीप्रमाणे जयंती साजरी करणेसाठी होर्डींग लावण्याचे यात ॲड करावे. छत्रपती संभाजी महाराज जयंती, रामनवमी, महात्मा फुले जयंती महात्मा बसवेश्वर महाराज जयंती, परशुराम महाराज, वि.दा.सावरकर, गोकुळाष्टमी असेल या दिवशीचे कार्यक्रमा निमित्ताने होर्डींग लावण्या बाबत यात ॲड करावे.

श्री.राजू शिंदे :दुरूस्तीसह मंजूर करावे. सर्व पदाधिकारी गट नेते सदस्य एकत्रित बसून नावे घ्यावी त्यानुसार मान्यता द्यावी.

मा.महापौर :प्रत्येक पक्षाचे गट नेते यांनी नावे द्यावी त्यानुसार दुरूस्ती करण्यात येईल.

श्री.राजू शिंदे :जे लिगल होर्डींग आहे, महापुरूषांचे असेल लावण्यास हरकत नाही. कितीही दिवस लावावे हरकत नाही. चौकास होर्डींग लावू नये. मा.न्यायालयाचे निर्देश आहे.

श्री.भगवान घडमोडे :प्रत्येक दिवशी म्हणजे ३६५ दिवस कुण्या तरी महापुरूषाचा जन्म झालेला आहे. त्यांचा यथोचित सन्मान करणे गरजेचे आहे परंतु तो होर्डींग लावून होते असे नाही. ज्याच्या सुचना आहेत त्या घ्याव्यात योग्य ती कार्यवाही करावी. लिगल होर्डींग असतील तेवढेच घ्यावे

श्री.त्र्यबक तुपे :जे उत्सव आहे ते यात घ्यावे.

मा.महापौर :हा विषय दुरूस्तीसह मंजूर, लिगल होर्डींग अस्तित्वात आहेत. लिगल होर्डींगचा जो होल्डर असेल त्याचे मार्फत लावू शकतो. सर्व पदाधिकारी, गटनेते यांनी एकत्रित बसून एक धोरण ठरवून यादी द्यावी. त्यानुसार ठरावात दुरूस्ती करता येईल.

मा.महापौर :प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात तात्पुरते फलक, बॅनर्स. जाहिराती बाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होणार नाही या अधिन राहून मुद्दा क्रमांक-**अ ते ई** मधील अटी व शर्तीस मान्यता देण्यात येते. तसेच स.पदाधिकारी स.उपमहापौर श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य, श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, श्री.जमिर अहेमद कादरी, तसेच श्रीमती शोभा गुरुलींगअप्पा बुरांडे, स.पालिका सदस्या, वॉर्ड क्र.१०९ यांनी दिलेल्या पत्रांनुसार व सभागृहात स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार सदरील प्रस्ताव दुरुस्तीसह मंजुर करण्यात येतो.

सन-२०१६ मध्ये सातारा-देवळाई नगर परिषदेचा महानगरपालिकेत समावेश झालेला असल्याने त्या भागातील होर्डिंगच्या माध्यमातून मनपात समावेश झाल्याच्या तारखेपासून आकारणी केल्यास वाढीव उत्पन्न मिळू शकते. शहर व सातारा-देवळाई परिसरातील होर्डिंगधारकांसाठी जाहिरात फलक नियमीत करून घेण्याकरीता व परवानगी असलेल्या होर्डिंगच्या आकारात वाढ करून घेण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देऊन अभय योजना राबविण्यात

यावी. या अभय योजनेनुसार नियमीत करावयाच्या होर्डिंग्ज्साठी प्रती होर्डींग र.रु.१५,०००/- ना-परतावा अनामत रक्कम घेण्यात यावी व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता उपआयुक्त, मालमत्ता अधिकारी यांना कळविले असता अद्याप कुठलीही कार्यवाही केलेली नाही. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे यासाठी सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक ०१ सप्टेंबर २०१८ पासून "अभय योजना" लागु करण्याची कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात तात्पुरते फलक, बॅनर्स इ.च्या सुसूत्रीकरणा बाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन प्रस्तावातील मुद्दा क्रमांक-**अ ते ई** मधील अटी व शर्तीस अधिन राहून व स.पदाधिकारी यांनी पत्राद्वारे सुचविलेल्या खालील धार्मिक उत्सव व महापुरूषांच्या जयंती दिनी तात्पुरत्या स्वरुपात फलक व बॅनर्स (होर्डींग्ज्) लावण्यास खालील अटी व शर्तीस अधिन राहून मान्यता देण्यात येते.

१) होर्डींग मधील मजकुर महानगरपालिकेच्या संबंधीत विभागास दाखविण्यात यावा व परवानगी घ्यावी.
२) अधिकृतपणे महानगरपालिकेची होर्डींग लावण्याची परवानगी घेतलेल्या होर्डींग परवाना धारकांनी ज्यांचे होर्डींग्ज् लावायचे आहे त्यांना महानगरपालिकेशी समन्वय साधून होर्डींग्ज् लावता येतील.
३) होर्डींग लावण्यासाठी मा.पोलिस आयुक्त, औरंगाबाद यांची व महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

| अ.क्र. | धार्मिक उत्सव व महापुरुषांच्या जयंती | दिनांक |
|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती (सरकारी तारखेनुसार) | १९ फेब्रुवारी |
| २. | छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तिथीनुसार) | ०४ मार्च |
| ३. | धर्मवीर संभाजी महाराज जयंती (सरकारी तारखेनुसार) | १४ मे |
| ४. | धर्मवीर संभाजी महाराज जयंती (तिथी नुसार) | २४ जुन |
| ५. | सावित्रीबाई फुले जयंती | ०३ जानेवारी |
| ६. | राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब जयंती | १२ जानेवारी |
| ७. | स्वामी विवेकानंद जयंती | १२ जानेवारी |
| ८. | संत गाडगेबाबा महाराज जयंती | २३ फेब्रुवारी |
| ९. | महावीर जयंती | २९ मार्च |
| १०. | महात्मा ज्योतीबा फुले जयंती | ११ एप्रिल |
| ११. | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल |
| १२. | महात्मा बसवेश्वर जयंती | १८ एप्रिल |
| १३. | रविंद्रनाथ टागोर जयंती | ०८ मे |
| १४. | स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती | २८ मे |
| १५. | अहिल्यादेवी होळकर जयंती | ३१ मे |
| १६. | राजर्षी शाहु महाराज जयंती | २६ जुन |
| १७. | संत कबीर जयंती | २८ जुन |
| १८. | लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती | २३ जुलै |

| | | |
|---|---|---|
| १९. | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती | ०१ ऑगस्ट |
| २०. | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोंबर |
| २१. | लालबहादुर शास्त्री जयंती | ०२ ऑक्टोंबर |
| २२. | महर्षि वाल्मीकि जयंती | २४ ऑक्टोंबर |
| २३. | गुरुनानक जयंती | २३ नोव्हेंबर |
| २४. | श्रीदत्त जयंती | २२ डिसेंबर |
| २५. | संत रोहिदास महाराज जयंती | ---- |
| २६. | संत झुलेलाल महाराज जयंती | ---- |
| २७. | संत गोरोबा काका जयंती | ---- |
| २८. | हनुमान जयंती | ३१ मार्च |
| २९. | संत सेवालाल महाराज जयंती | १५ फेब्रुवारी |
| ३०. | महाराणा प्रताप सिंह जयंती | १६ जुन |
| ३१. | मा.हिंदुह्दयसम्राट श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस | २३ जानेवारी |
| ३२. | वसंतराव नाईक जयंती | ०१ जुलै |
| ३३. | मा.श्री.उध्दवजी ठाकरे, शिवसेना पक्ष प्रमुख यांचा वाढदिवस | २७ जुन |
| ३४. | मा.श्री.अदित्यजी ठाकरे, युवा सेना अध्यक्ष, यांचा वाढदिवस | ---- |
| ३५. | मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे यांचा वाढदिवस तथा नववर्ष स्वागत दिन | ०१ जानेवारी |
| ३६. | मा.श्री.प्रदिपजी जैस्वाल जन्मदिवस | ---- |
| ३७. | मा.श्री.अंबादासजी दानवे जन्मदिवस | ---- |
| ३८. | मा.आमदार श्री.संजयजी शिरसाठ यांचा वाढदिवस | ---- |
| ३९. | प्रजासत्ताक दिन / गणराज्य दिन | २६ जानेवारी |
| ४०. | महाशिवरात्र | १३ फेब्रुवारी |
| ४१. | गुढी पाडवा | ---- |
| ४२. | गुड फ्रायडे | ३० मार्च |
| ४३. | मकर संक्रांत | १४ जानेवारी |
| ४४. | विद्यापीठ नाम विस्तार दिन | १४ जानेवारी |
| ४५. | अक्षय तृतीया | १८ एप्रिल |
| ४६. | ईद-ए-मिलादुन्नबी | २२ एप्रिल |
| ४७. | महाराष्ट्र दिन/ आंतरराष्ट्रीय कामगार दिन | ०१ मे |
| ४८. | शिवसेना वर्धापन दिवस | ०८ जुन |
| ४९. | शिवराज्यभिषेकोत्सव दिन | २५ जुन |
| ५०. | गुरु पौर्णिमा | ----- |
| ५१. | आषाढी एकादशी | ---- |
| ५२. | भारत स्वतंत्र दिन | १५ ऑगस्ट |
| ५३. | पतेती | १७ ऑगस्ट |
| ५४. | नारळी पौर्णिमा | ----- |
| ५५. | रक्षाबंधन | ---- |
| ५६. | मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन | १७ सप्टेंबर |

| | | |
|---|---|---|
| ५७. | मोर्हरम (ताजिया) | ---- |
| ५८. | इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस | ३१ ऑक्टोंबर |
| ५९. | सरदार वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस | ३१ ऑक्टोंबर |
| ६०. | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन | ०६ डिसेंबर |
| ६१. | औरंगाबाद महानगरपालिका वर्धापन दिन | ०८ डिसेंबर |
| ६२. | खिसमस/नाताळ | २५ डिसेंबर |
| ६३. | बकरी ईद (ईद-उल-अजहा) | ---- |
| ६४. | रमजान ईद (ईद-उल-फित्र) | ---- |
| ६५. | गणपती उत्सव | ---- |
| ६६. | दसरा (विजया दशमी) | ---- |
| ६७. | बौध्द पोर्णिमा | ---- |
| ६८. | श्रीराम नवमी | ---- |
| ६९. | श्रीरामदास नवमी | ---- |
| ७०. | नवरात्री उत्सव | ---- |
| ७१. | दिवाळी | ---- |
| ७२. | गणेश उत्सव | ---- |
| ७३. | श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव | ---- |
| ७४. | गौसे-आजम-दस्तगीर (ग्यारहवी) | ---- |
| ७५. | भगवान परशुराम जयंती | ---- |
| ७६. | पारसी नववर्ष दिन | ---- |
| ७७. | श्री.विश्वकर्मा जयंती | २९ जानेवारी |
| ७८. | गोस्वामी तुलसीदास जयंती | ३० जुलै |
| ७९. | लाला लजपतराय जयंती | २८ जानेवारी |
| ८०. | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | ---- |
| ८१. | जागतीक मुद्रण दिन | २४ फेब्रुवारी |
| ८२. | मराठी राजभाषा दिन | २७ फेब्रुवारी |
| ८३. | राष्ट्रीय विज्ञान दिन | २८ फेब्रुवारी |
| ८४. | जागतीक ग्राहक दिन | १५ मार्च |
| ८५. | जागतीक आरोग्य दिन | ०७ एप्रिल |
| ८६. | जागतीक पर्यावरण दिन | ०५ जुन |
| ८७. | जागतीक दृष्टीदान दिन | १० जुन |
| ८८. | शिक्षक दिन | ०५ सप्टेंबर |
| ८९. | औद्योगिक सुरक्षा दिन | ०२ नोव्हेंबर |
| ९०. | बालदिन | १४ नोव्हेंबर |
| ९१. | जागतीक महिला दिन | ०८ मार्च |
| ९२. | स्व.विलासराव देशमुख जयंती | २६ मे |
| ९३. | जागतीक रेडक्रॉस दिन | ०८ मे |
| ९४. | स्व.राजीव गांधी जयंती | २० ऑगस्ट |
| ९५. | स्व.इंदिरा गांधी जयंती | १९ नोव्हेंबर |

| | | |
|---|---|---|
| ९६. | स्व.अटलबिहारीजी वाजपेयी साहेब जयंती/पुण्यतिथी | ---- |
| ९७. | मा.पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी साहेब जन्मदिवस | ---- |
| ९८. | मा.श्री.अमितजी शहा साहेब जन्मदिवस | ---- |
| ९९. | मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब जन्मदिवस | ---- |
| १००. | मा.ना.रावसाहेबजी दानवे साहेब जन्मदिवस | ---- |
| १०१. | मा.ना.श्री.हरिभाऊजी बागडे साहेब जन्मदिवस | ---- |
| १०२. | स्व.गोपीनाथजी मुंडे साहेब जयंती / पुण्यतिथी | ---- |
| १०३. | स्व.प्रमोदजी महाजन साहेब जयंती / पुण्यतिथी | ---- |
| १०४. | मा.आ.श्री.अतूलजी सावे साहेब जन्मदिवस | ---- |
| १०५. | मा.श्री.किशनचंदजी तनवाणी साहेब जन्मदिवस | ---- |
| १०६. | संत शिरोमणी सावता महाराज जयंती | ---- |
| १०७. | संत तुकाराम बीज | ---- |
| १०८. | भाजपा स्थापना दिवस | ---- |

वरील सर्व महापुरूषांच्या जयंती दिनी, धार्मिक उत्सव, वाढदिवस, इत्यादी प्रसंगी तात्पुरत्या स्वरुपात होर्डींग्ज् व बॅनर्स लावण्यासाठी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन प्रशासनाने नियमानुसार परवानगी देण्यास मंजुरी देण्यात येते.

सन-२०१६ मध्ये सातारा-देवळाई नगर परिषदेचा महानगरपालिकेत समावेश झालेला असल्याने त्या भागातील होर्डिंगच्या माध्यमातून मनपात समावेश झाल्याच्या तारखेपासून आकारणी केल्यास वाढीव उत्पन्न मिळू शकते. शहर व सातारा-देवळाई परिसरातील होर्डिंगधारकांसाठी जाहिरात फलक नियमीत करून घेण्याकरीता व परवानगी असलेल्या होर्डिंगच्या आकारात वाढ करून घेण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देऊन अभय योजना राबविण्यात यावी. या अभय योजनेनुसार नियमीत करावयाच्या होर्डिंग्ज्साठी प्रती होर्डींग र.रु.१५,०००/- ना-परतावा अनामत रक्कम घेण्यात यावी व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता उपआयुक्त, मालमत्ता अधिकारी यांना कळविले असता अद्याप कुठलीही कार्यवाही केलेली नाही. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे यासाठी सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. वर नमुद केल्याप्रमाणे दिनांक ०१ सप्टेंबर २०१८ पासून “अभय योजना” लागु करण्याची कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२५:-** (सहाय्यक संचालक नगर रचना)

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ (क) नुसार दिनांक ३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून **प्रशमित संरचना** म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये शासन निर्णय क्रमांक टीपीएस १८१४/प्र.क्र.८२/१४ नियम/नवि-१३, दि.०७/१०/२०१७ (प्रशमित संरचना) पारीत करण्यात आलेला आहे. सदर नियमावलीमध्ये महानगरपालिका हद्दीमधील दि.३१ डिसेंबर, २०१५ पुर्वीचे अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी नियमित आकारण्यात येणाऱ्या शुल्कासह कंपाऊडींग चार्जेस आकारुन नियमित करण्यात येणार आहेत. नियमितीकरणासाठीची माहिती महानगरपलिकेच्या (www.aurangabadmahapalika.org) संकेत स्थळावर उपलब्ध आहे. या बाबतचे जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात देण्यात आलेले आहे. सोबत संबंधित शासन निर्णय जोडला आहे.

विकास नियंत्रण नियमावलीतील नियमांचे पालन न करता झालेल्या विकासास/करण्यात आलेल्या बांधकामांना नियमावलीतील नियमाच्या मर्यादेत प्रशमन शुल्क आकारुन बांधकाम नियमित करण्यात येईल. या नियमाद्वारे साधारणतः भूखंड नियमित करणे करीता जमिन विकास शुल्क, विकास खर्च व प्रशमन शुल्क तसेच त्यावरील बांधकामाकरीता शहर विकास निधी व विकास नियंत्रण नियमावली मर्यादेचे उल्लघंन करुन करण्यात आलेल्या बांधकामाकरीता प्रशमन शुल्क हे नियम क्रमांक १३ (a) ii नूसार खुला भूखंड नियमित करण्याकरीता जमिन विकास शुल्काच्या दुप्पट व त्यावरील बांधकाम नियमित करण्याकरीता शहर विकास निधीच्या दुप्पट प्रशमन शुल्क आकारण्यात येईल. (शासन निर्णयात कमीत कमी एवढी शास्ती आकारण्याची तरतूद आहे) तसेच नियम क्रमांक १३ (a) i नूसार इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस घेण्याची तरतूद आहे. मात्र औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत अंतर्गत विकासासाठी विकास खर्च रक्कमेचा भरणा करुन घेण्यात येतो. त्यामुळे वेगळा इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस आकारण्याची आवश्यकता नाही. तसेच सविस्तर माहितीसाठी शासन निर्णयामधील शासन निर्णयासह स्वतंत्र तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.

दरम्यान दिनांक १९/०६/२०१८ रोजी शासनातर्फे काही मुद्यांवर मार्गदर्शन प्राप्त झाले असून, त्यानूसार मुदत वाढ देण्याचा अधिकार नियोजन प्राधिकरणास असल्याचे म्हंटले आहे. मात्र प्रस्ताव स्विकारण्याची तारीख १८/०२/२०१९ पर्यंतच असावी व प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्याची कार्यवाही दि. १८/०२/२०२० पूर्वी पुर्ण करणे आवश्यक राहील असे बंधन घातलेले आहे.

यानंतर दि. ९ जुलै, २०१८ अन्वये या प्रकरणात शासनाने एक शासन निर्णय दिला आहे. त्यानुसार सदर प्रशमित संरचना नियमावली लागू करण्यासाठी नियोजन प्राधिकरणाने निर्णय घेऊन शासनाची पूर्व परवानगी घेणे बाबत सूचित केले आहे. तसेच दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या नियमातील तरतूद क्र. ६ नूसार मंजूर विकास योजनेतील आरक्षणे/झोनिंग बदलुन अनधिकृत बांधकामे प्रशमित संरचना म्हणून घोषित करावयाची झाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ मधील फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन त्यास शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच याबाबतची पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अशी कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे संबंधित नियोजन प्राधिकरणाचे मत झाल्यास तसे प्रस्ताव या निर्देशाच्या दिनांकापासून १ वर्षाच्या आत शासनास मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

अनाधिकृत बांधकामे नियमिती करणे करीता महानगरपालिकेच्या नोंदणीकृत परवाना धारक यांच्यामार्फत सक्षम कार्यालयाचे मालकी हक्क दर्शविणारे व मिळकतीचे स्थान निश्चित करणारे कागदपत्रांसह विहीत नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अखेरपर्यंत सादर करणे बाबत मुदत दिले आहे.

तरी शासन निर्णयानूसार कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :शुल्क जास्त आहे शर्ती अटी शिथील करणे आवश्यक आहे. या सभेचे निर्णयाच्या अधीन राहून धोरण निश्चित करावे दंडात्मक कार्यवाहीचे दर कमी करावे असेच धोरण असेल तर लिगल कुणी करणार नाही. इलिगल मालमत्ता जशाच तशा उभ्या राहतील.

श्री.राजगौरव वानखेडे :आरक्षणातील सर्व जागा यात आहेत का? कोणत्या जागा आहे. अतिक्रमण कुठे आहे गुंठेवारी व यात काय साम्य आहे. चेंज ऑफ यूज करायचे होते. मा.कोर्टाचे काही आदेश आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :आरक्षण झोनींग बदलून अनधिकृत बांधकामे याचा सर्वच उल्लेख यात आहे. नेमके अनधिकृत बांधकाम कोणते असते सांगावे. गुंठेवारीचा विषय आहे.

श्री.भगवान घडमोडे :शासनाचा जीआरची माहिती जनतेला झाली नाही. त्यामूळे अंमलबजावणी झाली. नेमका ठराव काय आहे? कशा व कोणत्या जागा नियमीत करणार आहे? जनतेला संभ्रम आहे. अटी शर्ती शिथील कराव्यात दंड कमी लावावा. जेणे करून प्रॉपर्टी नियमित होतील.

उपअभियंता(न.र) :दिनांक ७-१०-२०१७ रोजी प्रशमित संरचना म्हणून एक शासन जीआर झालेला आहे. ३१ डिसेंबर २०१५ पुर्वीचे अनाधिकृत बांधकामे हे अटी शर्तीच्या अधारे कंपाऊडींग स्ट्रक्चर म्हणून नियमित करण्याची तरतूद आहे. त्यात पहिला मुद्दा जो आरक्षण वगळणे होता. ९ जुलैला पुन्हा एक शुध्दीपत्रक काढले की, आरक्षण वगळायचे असेल तर रितसर कार्यवाही करूनच करावी. गुंठेवारीतील आरक्षण वगळण्याची तरतूद लोकल बॉडीला होती. ती यात नाही. यात रितसर कलम ३७ ची कार्यवाही करावी लागणार आहे. प्रशमित संरचना म्हणजे कम्पाऊंडींग चार्जेस आकारून शिवाय रेग्युलर चार्जेस आकारुन जे स्ट्रक्चर रेग्युलर करून देतो आहे. त्याला कम्पाऊंडींग स्ट्रक्चर मध्ये प्रशमित संरचना अशी संज्ञा दिली आहे. शासनाने चार्जेस ठरवून दिले आहे. शासन जीआर नुसार क्र.१३ मध्ये दिले आहे. डीसीआर नुसार ९ मी.रोड आवश्यक असतो तो ६ मी.पर्यत केला सामासिक अंतर डीसी रूल नुसार निम्म्या पर्यत केले जी आर मध्ये डिटेल दिलेले आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :कलम ३७ वर स्टे आलेला आहे. त्याची यात नोंद करायला पाहिजे. आरक्षीत असलेली जागा बदलू शकत नाही. त्यावर स्टे आहे. असे यात नमूद करणे आवश्यक होते.

उपअभियंता :एखादे आरक्षण चेंज करावयाची आवश्यकता आहे तर बदलू शकतो. मा.कोर्टाची परवानगी घ्यावी लागेल. स्टे आल्यानंतर ३७ ची कार्यवाही केली नाही.

श्री.राजेंद जंजाळ :वैयक्तीक जागेवर आरक्षण बदलून त्या इमारतीला रेग्यूलाईज करून दिले का?

उपअभियंता :माहिती घ्यावी लागेल.

श्री.नासेर सिध्दीकी :आरक्षणाची जागा होती तेथे वस्ती झाली काही प्रपोजल करायचे असेल तर ते काढू शकतो का?

उपअभियंता :मा.कोर्टाची मान्यता घ्यावी लागेल. त्यानंतर कार्यवाही करता येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :कोणकोणते आरक्षण वगळाता येते?

उपअभियंता :यात खेळाचे मैदान, उद्यान व ओपन स्पेस हे आरक्षण वगळता येणार नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :आरक्षण बदलण्याच्या कार्यवाहीवर मा.कोर्टाने स्थगीती दिलेली आहे. या ठरावात नोंद आली नाही. आता मान्यता दिली तर प्रशासन काही प्रॉपटीज लिगल रेग्युलाईज करतील. त्यावरचे आरक्षण काय? हे सुध्दा माहित असावे. त्यामूळे हा प्रस्ताव दुरूस्तीसह मंजूर करावा.

मा.महापौर :शर्ती अटी शिथील करणे, वाजवी शुल्क लावणे, सहज आणि सुलभ धोरण प्रशासनाने निश्चित करावे. प्रशासनाचे मत घेऊन दुरूस्तीसह चांगला ठराव केला जाईल.

श्री.भगवान घडमोडे :काही आरक्षण उठवायचे असेल तर मा.कोर्टाची परवानगी घेऊ शकतो का ?

उपअभियंता :मा.कोर्टाला विनंती करू शकतो मा. कोर्टाने मान्यता दिली तर पुढील कार्यवाही करता येईल.

मा.महापौर :प्रस्ताव दुरूस्तीसह मंजुर.

**<u>ठराव :-</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व स. सदस्यांचे मत विचारात घेता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ (क) नुसार दिनांक ३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८(१) अन्वये शासन निर्णय क्रमांक टीपीएस १८१४/प्र.क्र.८२/१४ नियम/नवि-१३, दि. ०७/१०/२०१७ (प्रशमित संरचना) पारीत करण्यात आलेला आहे. सदर नियमावलीमध्ये महानगरपालिका हद्दीमधील दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पुर्वीचे अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी नियमित आकारण्यात येणाऱ्या शुल्कासह कंपाऊडींग चार्जेस आकारुन नियमित करण्यात येणार आहेत. या बाबतचे जाहीर प्रगटन वर्तमानपत्रात सुध्दा देण्यात आलेले आहे. परंतु समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही ही वस्तुस्थिती आहे.

त्यामुळे विकास नियंत्रण नियमावलीतील नियमांचे पालन न करता झालेल्या विकासास / करण्यात आलेल्या बांधकामांना नियमावलीतील नियमाच्या मर्यादेत प्रशमन शुल्क आकारुन बांधकाम नियमित करण्यात येईल अशी सभागृहात बहुतांश सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली असल्याने या नियमाद्वारे साधारणत: भूखंड नियमित करणे करीता जमिन विकास शुल्क, विकास खर्च व प्रशमन शुल्क तसेच त्यावरील बांधकामा करीता शहर विकास निधी व विकास नियंत्रण नियमावली मर्यादेचे उल्लघंन करुन करण्यात आलेल्या बांधकामा करीता प्रशमन शुल्क हे नियम क्रमांक १३ (a) ii नूसार खुला भूखंड नियमित करण्या करीता जमिन विकास शुल्काच्या दुप्पट व त्यावरील बांधकाम नियमित करण्या करीता शहर विकास निधीच्या दुप्पट प्रशमन शुल्क आकारण्यात येईल. या प्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी. (शासन निर्णयात कमीत कमी एवढी शास्ती आकारण्याची तरतूद आहे) तसेच नियम क्रमांक १३ (a) i नूसार इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस घेण्याची तरतूद आहे. मात्र औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत अंतर्गत विकासासाठी विकास खर्च रक्कमेचा भरणा करुन घेण्यात येतो. त्यामुळे वेगळा इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस दर आकारण्याची आवश्यकता नाही असे सभागृहाचे मत आहे. तसेच सविस्तर माहितीसाठी शासन निर्णयामधील शासन निर्णयासह स्वतंत्र तक्ता सोबत जोडण्यात आलेला आहे.

परंतू, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात छोट्या भूखंडांमध्ये मिळकतीचे पोटविभाजन झालेले आहे व ते भूखंड समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील सामान्य कुटुंबातील नागरिकांनी विकत घेतलेले आहेत. त्यामुळे या भूखंडधारकांना या शासन नियमानुसार आकारण्यात आलेले शुल्क भरणा करणे शक्य होणार नसल्याने अशा समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील नागरीकांची घरांचे बांधकाम नियमितीकरण करणे शक्य होणार नसल्याने व ते कायम स्वरुपी अनधिकृत राहण्याची शक्यता असल्याने या सर्व भूखंडावरील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करणे शक्य नसल्याने अशा नागरिकांचे घरे नियमितीकरण होण्याच्या दृष्टीने या शासन नियमावलीनुसार येणाऱ्या शुल्काच्या रहिवासी वापराच्या करीताच्या ६०.०० चौ.मी. पर्यंत भूखंड व त्यावरील बांधकाम नियमित करणे करीता शासन निर्णयातील दराच्या २५% शुल्क, ६० ते २०० चौ.मी. पर्यंत भूखंड व त्यावरील बांधकाम नियमित करणे करीता ५०% शुल्क व त्यावरील भूखंडांना शासन नियमावलीनुसार येणारे शुल्क आकारण्यात यावे. वाणिज्य वापराकरीता सर्वच भूखंडांना शासन नियमावलीनुसार शुल्क आकरण्यात यावे. तसेच या नियमावली अंतर्गत अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १८/०२/२०१९ पर्यंत वाढविण्यात यावी. तसेच भूखंडाचे स्थान निश्चित होणे करीता सक्षम कार्यालयाच्या मोजणी नकाशासह अर्ज दाखल करणे बाबत नमूद करण्यात आलेले आहे. परंतू सर्वच मिळकत धारकांना मोजणी नकाशा दाखल करणे शक्य होणार नसल्याने वाढीव हद्द विकास योजना तयार करतांना अस्तित्वातील जमिन

वापर (E.L.U.), विकास योजना आराखडयामध्ये दर्शविण्यात आलेले अस्तित्वातील बांधकामानुसार भूखंडाचे स्थान निश्चित करुन त्यानुसार भूखंड नियमित करण्यात यावे. यामध्ये सिडको कार्यालयामार्फत औरंगाबाद झालर क्षेत्राकरीता तयार करण्यात आलेल्या विकास योजना आराखड्याचाही समावेश राहील.

तसेच औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी गुंठेवारी अधिनियमाचे नियमितीकरण करतांना केलेले सर्वेक्षण नकाशे ग्राह्य धरण्यात यावे. ज्या मिळकतीची खरेदी-विक्री नोंदणीकृत दस्तऐवजाने न करता मुद्रांकांवर झालेली आहे. अशा मिळकती ही नियमितीकरणासाठी विचार करुन त्या नियमित करण्यात याव्यात. तसेच नोंदणीकृत वास्तुविशारद यांच्यामार्फत प्रमाणित केलेले नकाशे प्रस्ताव अधिकृतपणे ग्राहय धरण्यात यावे. तसेच या नियमावलीची जनजागृती व नागरिकांना सदरील नियमा अंतर्गत प्रस्ताव दाखल करणेकरीता प्रोत्साहीत करणेकरीता एक स्वतंत्र कक्ष स्थापना करावा. दिनांक ०१ सप्टेंबर २०१८ पासुन सहा महिने कालावधीसाठी शहरातील अनधिकृत बांधकाम नियमितीकरण करणेची योजना जाहीर करावी. अनधिकृत बांधकामे (साधारणत:) भूखंड नियमित करणेबाबत या योजनेअंतर्गत प्रस्ताव/प्रकरण महानगरपालिका प्रशासनाने महानगरपालिकेकडे दाखल करून घ्यावेत करणेबाबत जाहीर प्रगटन देऊन दाखल करुन शासन निर्णय झाल्यानंतर उक्त नियमितीकरण करणे बाबतची कार्यवाही करावी. गुंठेवारी कायद्याप्रमाणे बांधकाम नियमितीकरण करणे बाबत जे शासनाचे धोरण आहे. (क्षेत्र, सामासिक अंतर व इत्यादी बाबत) त्यानुसार/त्या धर्तीवर महानगरपालिका प्रशासनाने नविन धोरण निश्चित करुन त्यास शासनाची मान्यता घेऊन तात्काळ कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.रामेश्वर भादवे :एशीयन सिटी केअर हॉस्पीटलला २ तारखेला परवानगी दिली आहे. ती नियमानुसार दिली का?

आरोग्य अधिकारी :मुंबई नर्सींग होम ॲक्ट नुसार जी पुर्तता लागते ती करून घेतली आहे. इतर आवश्यक फायर एनओसी, मालमत्ता कर, नगररचना विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आहे. मा.आयुक्तांच्या मान्यतेने सर्व बाबी सादर करून याची मान्यता घेऊन कार्यवाही केली आहे.

श्री.रामेश्वर भादवे :ठराव क्रमांक ७०५ दिनांक २०.०१.२०१५ ठराव घेतला होता त्यात नियम व अटी शर्ती लागू केल्या होत्या. जी परवानगी दिली ती किती खाटांची दिली? १०० खाटांच्या वर असेल तर त्यास चार्जेस लावणार होतो का? किती चार्जेस भरले आहे.

आरोग्य अधिकारी :१०० खाटांचा परवानगी आहे. त्या नियमानुसार संचिका नगर रचना विभागाकडे वर्ग केली होती. चार्जेस तो विभाग करतो. चार्जेस घेतल्याचे ना हरकत प्रमाणपत्र नगर रचना विभागाने सादर केल्यामूळे पुढील कार्यवाही केली.

श्री.रामेश्वर भादवे :शासनाचा महसूल बुडविला आहे. यात गैरव्यवहार झाला चुकीच्या पध्दतीने काम केले आहे. चार्जेस का घेतले नाही?

मा.महापौर :संबंधीत सदस्यांना अधिकारी यांनी या बाबतीत लेखी खुलासा करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :यामध्ये रु.१.०८ कोटी चार्जेस लागणार होते ते महापालिकेने भरून घेतले नाही. मनपाचे नुकसान झाले. राज्य शासनाचा नियम आहे जे दर आहे ते घ्यायला पाहिजे होते. १०० खाटांच्या वर जे दर आहे ते का लावले नाही? किती फिस होत होती ती का आकारली नाही?

मा.महापौर :मा.आयुक्तांनी यांची माहिती घ्यावी. योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.रामेश्वर भादवे :दिलेले प्रमाणपत्र रद्द करावे जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. रु.१.०५ कोटी थोडी रक्कम नाही. दिशाभूल केलेली आहे. मी पत्र ही दिले त्यांचा विचार केला नाही.

मा.आयुक्त :हे प्रकरण मी बघून घेतो. कार्यवाही होईल.

श्री.रामेश्वर भादवे :यात दोषी आहे कार्यवाही करावी. नसता, मी या बाबतीत मा.कोर्टात दाद मागेल. चौकशीची गरज नाही सर्व पुरावे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्त तपासणी करतील तोपर्यत स्थगीती द्यावी.

**विषय क्रमांक ६२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे संत एकनाथ रंगमंदिर येथे वातानुकूलन व्यवस्था (Centralized Air Conditioner) स्थापित करणेच्या कामासाठी विभागाने खुल्या बाजारातून तीन दरपत्रक प्राप्त करून सर्वात कमी दराची जी.एस.टी. वगळून र.रु.१,६०,१८,६२०/- च्या दराची शिफारस केली असता, या प्रकरणी प्रथम अंदाजपत्रकीय तरतुद उपलब्ध करून देणेस व उक्त काम हाती घेणेस प्रशासकीय मान्यतेसाठी सविस्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे उचित राहील. मान्यता झाल्यानंतर AC च्या कामासाठी तज्ञ व्यक्तीकडून अंदाजपत्रक (BOQ) तयार करणे व त्यास तांत्रिक मान्यता घेणेस व निविदा काढणेस असे अभिप्राय प्राप्त झाले. या अभिप्रायानुसार प्रशासकीय स्तरावर ठरल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथील कामासाठी पुर्वी पासून कार्य करीत असलेले नियुक्त पी.एम.सी.तज्ञ मे.अस्ट्युट इंजिनीअरींग सर्व्हीसेस प्रा.लि.पुणे, यांनी र.रु.१,७३,७०,६४३/- चे अंदाजपत्रक (BOQ) तयार करून महानगरपालिका प्रशासनाकडे सादर केले असता, प्रशासकीय स्तरावर ठरल्याप्रमाणे सदर अंदाजपत्रक (BOQ) चा प्रस्ताव तपासणी व छानननी करीता मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आला व प्राचार्य यांनी नियुक्त केलेल्या यांत्रिकी विभागाच्या तज्ञ समितीने महानगरपालिकेचे संबंधीत विद्युत व स्थापत्य अभियंते यांचे सोबत संत एकनाथ रंगमंदिराची पाहणी केली तसेच त्यांचे पत्र दि.२६.०७.२०१८ अन्वये महानगरपालिकेने र.रु.३,५४,०००.०० शुल्कचा धनादेशाद्वारे त्यांचेकडे भरणा केला त्या नंतर सादर केलेल्या प्रस्तावाची त्यांनी छाननी करून त्यांचे पत्र जा.क्र./शाअमऔ/टेस्टिंग/यंत्र/२६२१ दि.०३.०८.२०१८ नुसार खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहे.

विषयांकीत मुद्यानुसार व संदर्भीय पत्रानुसार या संस्थेच्या तज्ञ व्यक्तींकडून सदर प्रस्तावाची तांत्रिक छाननी करण्यात आली. या संस्थेचे तज्ञ व आपल्या विभागाचे संबंधीत अभियंते यांनी सदर जागेची संयुक्तिक पाहणी करून केलेल्या चर्चेनुसार व पी.एम.सी.यांनी आपल्याकडे सादर केलेला आणि आपल्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी करण्यात आली. सदर प्रस्ताव तांत्रिक दृष्ट्या योग्य असल्यामुळे तांत्रिक मान्यतेची शिफारस आहे. या प्रस्तावातील बाबी (BOQ) म्हणुन घेण्यास हरकत नाही.

सदर पत्रासोबत जोडलेले. Heat Load Calculation Sheet मध्ये काही गणक व मांडणी विषयक त्रुटी आढळते. आपल्या पत्रासोबत जोडलेले M/s Astute Engineering Services Pvt.Ltd. यांनी तयार केलेली उपकरणांची यादी तांत्रिक दृष्टिकोनातून योग्य आहे. सद्यस्थितीत सदर उपकरण उभारणी करण्याकरीता खालीलप्रमाणे सुचना करण्यात येत आहे.

१. प्रत्यक्ष कामाच्या वेळी पुनर्निर्माण दरम्यान बदल झाल्यास आभासी छताची उंची स्थापत्य विभागाने निश्चित केल्यानंतर परत एकदा सदर उल्लेखित Heat Load गणना करण्यात यावी. तसेच आभासी छताची उंची इष्टतम असावी.
२. मंचकावर तसेच इतर ठिकाणी बाहेरच्या हवेचा संपर्क थांबविण्याकरीता उपाय योजना करण्यात यावी.

३. सदर यंत्र पुरवठा व उभारणी करण्याच्या उद्देशाने निविदा मागवितांना या स्पर्धेत भाग घेण्याऱ्या सर्व निविदाधारकांकडून स्वतंत्रपणे Load Calculation व Proposed System Design घेण्यात यावे.
४. सदर प्रस्तावातील (BOQ) बाबी हे निविदाधारकांच्या संदर्भाकरीता देण्यात याव्या. निविदाकरांनी प्रस्तावीत केलेल्या Proposed System Design मध्ये अंतर्भुत असलेल्या फरकापासून (BOQ) मध्ये बदल संभावतो.
५. Bureau of Energy Efficiency, Mop, Govt. of India यांचे Star Rating असलेली उपकरणे घेण्यात यावी.

वरील अधोरेखित अभिप्रायानुसार प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्यामुळे तांत्रिक मान्यतेची शिफारस केलेली आहे. त्यामुळे प्रस्तावित (BOQ) आधारे निविदा काढणेस आणि त्यांचे वरील सुचना अ.क्र.१ ते ५ आणि इतर अटी व शर्ती निविदा सुचनेमध्ये समाविष्ट करणेस मान्यतेस्तव.

मा.महापौर व मा.सभापती, स्थायी समिती यांनी संत एकनाथ रंगमंदिर येथे वातानुकूलन यंत्रणा बसविल्याशिवाय इतर कामे करणे शक्य नसल्यामुळे हे काम करणे अत्यंत गरजेचे आहे असे कळविले आहे. तसेच सदरील काम अल्प मुदतीच्या निविदा काढून त्वरित हाती घेण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच या कामासाठी र.रु.२ कोटी तरतुद उपलब्ध करणेचे मा.महापौर यांच्या पत्रावर निर्देश आहेत.

करीता उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,७३,७०,६४३/- चा प्रस्ताव आणि सोबतच्या अटी व शर्ती निविदा सुचनेत समाविष्ट करून अल्प मुदतीच्या निविदा काढणेस तसेच या कामासाठी र.रु.२ कोटी तरतुद उपलब्ध होणेस प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे संत एकनाथ रंगमंदिर येथे वातानुकूलन व्यवस्था (Centralized Air Conditioner) स्थापित करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.१,७३,७०,६४३/- चा प्रस्ताव आणि सोबतच्या अटी व शर्ती निविदा सुचनेत समाविष्ट करून अल्प मुदतीच्या निविदा काढण्यास तसेच या कामासाठी र.रु.२ कोटी तरतुद उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ६२७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहाची सध्या अत्यंत दुर्दशा झालेली आहे. छतामधून पावसाच्या पाण्याची गळती होत आहे. तसेच फ्लोरिंग, भिंती, पैनलिंग, सिलींग, फ्लोअर टाईल्स्, कार्पेट इ.नादुरूस्त झालेले आहेत. तसेच सभागृहाची ध्वनिक्षेपण व्यवस्था अस्तित्वात नसल्यामुळे भाडेतत्वावर घ्यावी लागते. Air Cooling system निकामी झाल्यामुळे सभागृहामध्ये पाहिजे तसे तापमान नियंत्रित करणे शक्य होत नाही. Jumbo Cooler भाड्याने लावून सभागृह शीत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु ते देखील समाधान कारक नसल्याचे सर्व स.सदस्य यांच्याकडून प्रतिक्रिया आहेत. त्यामुळे अनेकवेळा आभासी छताच्या आत व इतर ठिकाणी स्पार्किंगच्या घटना घडत आहेत. सभागृहातील ही सर्व कामे सुमारे २० वर्षापुर्वी झालेली असल्यामुळे त्यांचे आयुष्यमान संपलेले आहे.

यामुळे संपुर्ण सभागृहाचे मोठ्या प्रमाणावर नुतनीकरण करून सभागृहातील सर्व व्यवस्था अद्यावत व सुसज्ज करणे अत्यंत आवश्यक आहे आणि हे काम करणेसाठी मा.महापौर, मा.पदाधिकारी, मा.आयुक्त महोदय आणि स.सदस्य यांनी वेळोवेळी बैठकीत सुचना केलेल्या आहेत. प्राप्त सुचना व आदेशानुसार विभागने उपरोक्त सर्व कामे अद्यावत करणेसाठी त्या-त्या क्षेत्रातील संबंधीत कामाचे तज्ञ कन्सलटन्ट यांचेकडून तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक एकूण र.रु.१,९१,२२,५२४.०० आहे.

सदर अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या SSR/CSR मधील दरानुसार तयार करण्यात आले असून ज्या बाबींचे दर SSR/CSR मध्ये उपलब्ध नाहीत ते दर खुल्या बाजारातून घेण्यात आले आहे. भाग-१ ते भाग-५ या कामांची स्वतंत्र अंदाजपत्रकीय रक्कम खालील प्रमाणे आहे.

| भाग क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकीय र.रु. |
|---|---|---|
| भाग-१ | स्थापत्य व अंतर्गत सजावटीची कामे ए.सी.शीट बदलणे, फॉल सिलींग करणे, अकॉस्टिक सहित पैनलिंग बदलणे, फ्लोरिंग बदलणे व रंगरंगोटी करणे इ. कामे करणे. (Civil & Interior Works) | ५४,४२,९८६.०० |
| | पी.एम.सी.शुल्क ४%+जी.एस.टी. | २,५६,९०८.०० |
| भाग-२ | अद्यावत केंद्रीय वातानूकूलन व्यवस्था (HVAC Central System) | २३,२२,०९६.०० |
| भाग-३ | ध्वनीक्षेपण व व्हिडीओ व्यवस्था, प्रोजेक्टर व पडदे सहित स्थापित करणे PA (Audio-Video System along with Projector & Screens) | ७२,१४,६९५.०० |
| भाग-४ | विद्युतीकरण, अग्नी सचेतक व्यवस्था, डीजल जनरेटर आणि वॉटर कुलर (Electrification, Fire Alarm System, D.G.& Water Cooler) | ३०,७६,३६९.०० |
| भाग-५ | कॅमेराद्वारे निगराणी व्यवस्था स्थापित करणे (Surveilliance System) | ५,००.०००.०० |
| | भाग-२ ते ५ चे पी.एम.सी.शुल्क २%+जी.एस.टी. | ३,०९,४७०.०० |
| | **एकूण अंदाजपत्रक रक्कम रुपये** | **१,९१,२२,५२४.००** |

वरीलप्रमाणे पाच भागांचे स्वतंत्र निविदा काढून पाच एजन्सी नियुक्त केल्यास ही कामे तातडीने आणि वेळेवर मार्गी लागतील. तसेच वरील पाच भाग हे तांत्रिकदृष्ट्या वेगवेगळे असल्यामुळे देखील वेगवेगळ्या निविदा काढणे उचित होईल. वरील पाच कामांकरीता पाच स्वंतत्र निविदा काढणेस मान्यतेस्तव.

पाच भागांपैकी सर्वात महत्वाचे आणि प्राधान्यक्रमाने ताबडतोब छताचे जुने सिमेंटचे पत्रे काढून त्या ठिकाणी नवीन छत/पत्रे टाकणे अत्यंत आवश्यक आहे. कारण छतामधून सर्व बाजूने पावसाच्या पाण्याची गळती होऊन जुन्या फॉल-सिलींग मधून पाणी पाझरत आहे. ही बाब धोकादायक असून सभागृहात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता, त्वरीत कामे हाती घेणे आवश्यक आहे. या कामासाठी मा.महापौर यांनी दिनांक ०६.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये र.रु.१,६३,६२,३२१.०० तरतुद उपलब्ध केलेली आहे. आता सुधारित बाबनिहाय अंदाजपत्रकानुसार वाढीव र.रु.२७,६०,२०३.०० सह एकूण र.रु.१,९१,२२,५२४.०० उपलब्ध करणेस मान्यतेस्तव.

तसेच या सर्व कामाची अंदाजपत्रके, डिझाईन व नकाशे तयार करणे, निविदा पुर्व व नंतरच्या कामासाठी तांत्रिक सल्ला देणारे संबंधीत पी.एम.सी.भाग-१ च्या कामांसाठी मे.डी.पी.डिझाईन श्री.प्रदीप देशपांडे यांना आणि भाग-२ ते भाग-५ च्या कामांसाठी मे.ए.एम.बी.इंजिकॉन प्रा.लि. यांना ठरल्यानुसार वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे शुल्क अदा करणेच्या रक्कमेसह सर्व कामांचे अंदाजपत्रक र.रु.१,९१,२२,५२४.०० चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहातील छतामधून पावसाच्या पाण्याची गळती, तसेच फ्लोरिंग, भिंती, पैनलिंग, सिलींग, फ्लोअर टाईल्स्, कार्पेट इ.नादुरूस्त असुन सभागृहाची ध्वनिक्षेपण व्यवस्था, Air Cooling system कार्यान्वित

करणे, या सर्व कामाचे प्रस्तावात नमुद केलेले भाग-१ ते भाग-५ ची स्वतंत्र अंदाजपत्रकांनुसार या कामासाठी डिझाईन व नकाशे तयार करणे, निविदा पुर्व व नंतरच्या कामासाठी तांत्रिक सल्ला देणारे संबंधीत पी.एम.सी.भाग-१ च्या कामांसाठी मे.डी.पी.डिझाईन चे श्री.प्रदीप देशपांडे यांना आणि भाग-२ ते भाग-५ च्या कामांसाठी मे.ए.एम.बी.इंजिकॉन प्रा.लि. यांना ठरल्यानुसार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे शुल्क अदा करणेच्या रक्कमेसह एकत्रित सर्व कामांचे र.रु.१,९१,२२,५२४.०० च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१९, आरेफ कॉलनी येथील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रेटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१७-२०१८ च्या दरसुची (State e DSR 2017-2018) नुसार र.रु.७९,९९,४३०/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातील मा.महापौर यांनी सुचविलेल्या अत्यावश्यक कामांसाठीच्या तरतुदीतून करण्यात येणार असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

करीता, प्रस्तावित कामाचे र.रु.७९,९९,४३०/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१९, आरेफ कॉलनी येथील मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रेटींग करणेच्या कामाच्या र.रु.७९,९९,४३०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६२९:-**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड येथे राखून ठेवण्यात आलेल्या जागेत मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक-९७ दिनांक ३१.०८.२००८ व स्थायी समिती ठराव क्रमांक-१२७ दि.२७.०८.२००९ नुसार बी.ओ.टी.तत्वावर मल्टी डायग्नोस्टिक सेंटर (सिटी स्कॅन, एक्स-रे, मॅमोग्राफी, पॅथॉलॉजी लॅब इ.) मे.तापडिया डायग्नोस्टिक सेंटर तर्फे सुरु करण्यात आलेले आहे. सदरील संस्थेसोबत दि.२९.०८.२००९ रोजी करारनामा (Lease Deed) करण्यात आलेला होता. सदरील करारनामा सात वर्षाकरीता करण्यात आला होता. (दि.०१.०९.२००९ ते दि.३१.०८.२०१६)

दिनांक १९.०३.२०१८ रोजी (दि.१५.०२.२०१८ रोजीची तहकुब सभा,का.प.क्र.-०७) विषय क्रमांक-३२१ नुसार मा.सर्वसाधारण सभेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीवनबाई तापडीया चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेतर्फे तापडीया डायग्नोस्टिक सेंटर चालविण्यात येत असून आरोग्यविषयक चाचण्या कमी दरामध्ये करून देण्याचे काम या सेंटरमध्ये केले जाते. सदरील बाब व्यापक लोकहिताशी निगडीत असून सेवाभावी वृत्तीने सदरचे डायग्नोस्टिक सेंटर चालविण्यात येत असल्याने स.सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे सुधारणांचा समावेश करून पुढील कालावधीसाठी संबंधीत संस्थेस मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

१. महानगरपालिकेचे मा.महापौर,मा.सभापती, स्थायी समिती, मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेल्या रुग्णांना २०% सवलत देण्यात यावी.
२. महानगरपालिकेचे स.नगरसेवक यांनी शिफारस केलेल्या रुग्णाना १०% सवलत देण्यात यावी.
३. महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी कॅम्प आयोजित करून मोफत आरोग्य तपासणी करावी.

याअतिरिक्त अटींचा समावेश करारनाम्यामध्ये करण्यात यावा. त्याचप्रमाणे दिनांक ०९.०५.२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक-७६० ची अंमलबजावणी करावी. करारनाम्यातील अटी-शर्तीच्या अधिन राहून महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड येथील जागेत सुरु असलेल्या तापडीया डायग्नोस्टिक सेंटरला स.सदस्यांनी केलेल्या सुचनेनूसार व चर्चेनूसार पुढील कालावधीसाठी सुधारित करारनामा करण्यास मा.सर्वसाधारण सभेने वरीलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

या अनुषंगाने दि.३१.०५.२०१८ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनात तापडिया डायग्नोस्टिक सेंटरच्या लिज करारनामा नुतनीकरणाबाबत बैठक संपन्न झाली. सदरील बैठकीच्या अनुषंगाने विश्वस्त जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट यांचे दि.०१.०६.२०१८ रोजी दिलेल्या अर्जानुसार तापडिया डायग्नोस्टिक सेंटरचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे.

१. मागील करारनामा ७+७+७ वर्षासाठी होता. करीता आता नवीन करारनामा ७+७ वर्षासाठी करण्यात यावा. वरील लिज करारनामा १४ वर्षाकरीता सप्टेंबर-२०१६ च्या प्रलंबीत तारखेपासून प्रभावित करण्यात यावा.
२. सदरील लिज भाडे मा.आयुक्त साहेब यांच्याशी झालेल्या चर्चेप्रमाणे रु.५०,०००/- प्रतिमाह ऐवजी ॲव्हरेज मासिक रॉयल्टी + रु.२०,०००/- या प्रमाणे एकत्रित निश्चित करून देण्यात यावे. मागील ७ वर्षाचे ॲव्हरेज मासिक रॉयल्टी रु.७५,७३६/- इतकी + मासिक भाडे रु.२०,०००/- (ह्यापुर्वीच्या लीज करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे) आम्ही मनपाला एकत्रित निश्चित भाडे रु.९५,७३६/- दरमहा होते. आम्ही रु.९६,०००/- प्रतिमाह देण्यास तयार आहोत.
३. तसेच सदरील एकत्रित दरमहा भाडे दर तीन वर्षांनी मुळ भाड्यात ५% (पाच टक्के) वाढ करण्यात येईल.
४. वैद्यकीय सेवांचे सध्याचे जे सवलतीचे दर आहेत तेच कायम राहतील. या बाबत काही दरवाढ अथवा फेरबदल करावयाचे झाल्यास याबाबत दरवर्षी डिसेंबर महिन्यात मा.आयुक्त साहेब यांच्या अध्यक्षतेखाली असणारी समिती दरवेळी वैद्यकीय सेवांचे दर निश्चित करेल. सदरील समितीमध्ये मा.आयुक्त, मा.महापौर व तापडिया डायग्नोस्टिक तर्फे प्रतिनिधी राहतील.

करीता, मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक-३२१ पारित केलेला ठराव व विश्वस्त जीवनबाई तापडिया चॅरिटेबल ट्रस्ट यांचे दि.०१.०६.२०१८ रोजी दिलेल्या अर्जानुसार शहानिशा केली असता, जास्त तफावत दिसून येत नाही. त्यांनी कळविल्याप्रमाणे रु.९६,०००/- (शह्यान्नव हजार रुपये फक्त) ऐवजी राऊंड फिगर रु.१,००,०००/- (एक लक्ष रुपये फक्त) प्रतिमाह संबंधीतांकडून घेणे, तसेच दर ७ वर्षांनी करारनामा नुतनीकरण करणे, दर ३ वर्षांनी ५% भाडे वाढ करणे तसेच सेवा सुविधांच्या दराबाबत दर ३ वर्षांनी मा.महापौर, मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच विश्वस्त तापडिया डायग्नोस्टिक सेंटर किंवा त्यांचे प्रतिनिधी यांची बैठक घेऊन दर निश्चिती करणे, मुळ करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहून करारनामा नुतनीकरण करणे व प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय दुरुस्तीसह मंजुर.

**<u>ठरावः-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वेस्टेशन रोड येथे राखून ठेवण्यात आलेल्या जागेत जीवनबाई तापडीया चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेतर्फे चालविण्यात येत असलेल्या तापडीया डायग्नोस्टिक सेंटर यांनी केलेल्या विनंतीनुसार खालीलप्रमाणे दुरुस्तीसह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

१. लीज भाडे रु.९६,०००/- (शह्यान्नव हजार रुपये फक्त) ऐवजी राऊंड फिगर रु.१,००,०००/- (एक लक्ष रुपये फक्त) प्रतिमाह संबंधीत संस्थेकडून घेण्यास मंजुरी देण्यात येते.

२. दर ७ वर्षांनी मुळ करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहून करारनामा करण्यास तसेच प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सप्टेंबर-२०१६ च्या प्रलंबित तारखेपासुन करारनामा प्रभावित करण्यास मंजुरी देण्यात येते.
३. करारनामा नुतनीकरणास तसेच सर्वसाधारण सभेमध्ये वेळोवेळी झालेल्या ठरावानुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यात येतात.
४. एकत्रित दरमहा भाडे दर ३ वर्षांनी मुळ भाड्यात ५% (पाच टक्के) भाडेवाढ करण्यास मंजुरी देण्यात येते.
५. वैद्यकीय सेवांचे सध्याचे जे सवलतीचे दर आहेत तेच कायम राहतील. या बाबत काही दरवाढ अथवा फेरबदल करावयाचे झाल्यास दरवर्षी डिसेंबर महिन्यात मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली असणारी समिती ज्यामध्ये मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच विश्वस्त तापडिया डायग्नोस्टिक सेंटर किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. ह्या समितीस दरवेळी वैद्यकीय सेवांचे दर निश्चित करण्यास मंजुरी देण्यात येते.
६. या व्यतिरीक्त संबंधीत ट्रस्टच्या बाबतीत सर्वसाधारण सभेमध्ये वेळोवेळी पारित झालेले ठराव व पुर्वीच्या अटी व शर्ती, करारनामा इ.च्या अधिन राहून कार्यवाही करण्याचे संपुर्ण अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५० अंतर्गत नागरीकांचे सोईसाठी खालीलप्रमाणे कामे रहिवासीयांच्या सुविधेसाठी करणे आवश्यक असून त्यासाठी लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे. करीता लेखाशिर्ष बदली करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र./ए.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | वळती करण्याची रक्कम |
|---|---|---|---|
| SCR-ZONE-1P.NO.03 Sr.No.28 | वॉर्ड क्र.५० मध्ये विविध भागात कॉंक्रीटींगची कामे करणे. आर्थिक तरतुद र.रु.२५ लक्ष | १. वॉर्ड क्र.५० अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत डेकोरेटिव्ह कामे करणे.<br>२. वॉर्ड क्र.५० कोतवालपुरा गरमपाणी येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणे. | रु.१५ लक्ष<br>रु.१० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यारखान **अनुमोदक:-**श्री.जमीर अहेमद कादरी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून तरतुद उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र./ए.क्र. | जुन्या कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | वळती करण्याची रक्कम |
|---|---|---|---|
| SCR-ZONE-1P.NO.03 Sr.No.28 | वॉर्ड क्र.५० मध्ये विविध भागात कॉंक्रीटींगची कामे करणे. आर्थिक तरतुद र.रु.२५ लक्ष | १. वॉर्ड क्र.५० अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत डेकोरेटिव्ह कामे करणे.<br>२. वॉर्ड क्र.५० कोतवालपुरा गरमपाणी येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणे. | १५ लक्ष<br>१० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा या प्रभागातील अर्थसंकल्पातील असलेली तरतुद खालील दर्शविल्याप्रमाणे वळती करण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पा.नं. व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| शहरी भागात पुर्नडांबरीकरण एससीआर झोन क्र.०५ पान क्र.१८, अ.क्र.४ | वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथे विविध ठिकाणी रस्त्याचे वॉल-टू-वॉल डांबरीकरण करणे. र.रु.५०.०० लक्ष | वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको हनुमान मंदिर ते सेक्टर-एफ येथे रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. र.रु.५०.०० लक्ष |
| शहरी भागात पुर्नडांबरीकरण एससीआर झोन क्र.०५ पान क्र.१८, अ.क्र.५ | वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे डांबरीकरण करणे. र.रु.१.०० कोटी | १) वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथे रस्त्याच्या साईडला पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.४० लक्ष<br>२) वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत सुवर्णलघू उद्योग येथे पाईप टाकून रस्त्याचे काँक्रीटी करण करणे. रु.१०.०० लक्ष.<br>३) वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथे सेक्टर ई व सी येथील खुल्या जागेत उर्वरित शेड तयार करणे. र.१०.०० लक्ष<br>४) वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथे विविध ठिकाणी वॉल-टू-वॉल काँक्रीटीकरण करणे. रु.३२.०० लक्ष.<br>५) वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथील डॉ.शामाप्रसाद मुखर्जी उद्यान विकसीत करणे. रु.०८.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथे खालील दर्शविल्याप्रमाणे वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्प पा.नं. व अ.क्र. | कामाचे नाव | सुधारित कामाचे नाव |
|---|---|---|
| शहरी भागात पुर्नडांबरीकरण एससीआर झोन क्र.०५ पान क्र.१८, अ.क्र.४ | वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथे विविध ठिकाणी रस्त्याचे वॉल-टू-वॉल डांबरीकरण करणे. र.रु.५०.०० लक्ष | वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको हनुमान मंदिर ते सेक्टर-एफ येथे रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे. र.रु.५०.०० लक्ष |
| शहरी भागात पुर्नडांबरीकरण | वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. | १) वॉर्ड क्र.३८,एन-१ सिडको येथे रस्त्याच्या साईडला पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.४० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| एससीआर झोन क्र.०५ पान क्र.१८, अ.क्र.५ | चिकलठाणा येथे डांबरीकरण करणे. र.रु.१.०० कोटी | २) वॉर्ड क्र.३८, एम.आय.डी.सी. चिकलठाणा अंतर्गत सुवर्णलघू उद्योग येथे पाईप टाकून रस्त्याचे कॉंक्रीटी करण करणे. रु.१०.०० लक्ष.<br>३) वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथे सेक्टर ई व सी येथील खुल्या जागेत उर्वरित शेड तयार करणे. र.१०.०० लक्ष<br>४) वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथे विविध ठिकाणी वॉल-टू-वॉल कॉंक्रीटीकरण करणे. रु.३२.०० लक्ष.<br>५) वॉर्ड क्र.३८, एन-१ सिडको येथील डॉ.शामाप्रसाद मुखर्जी उद्यान विकसीत करणे. रु.०८.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पुंडलिकनगर हा परिसर ज्येष्ठ समाजसेवक स्व.पुंडलिक राऊत यांच्या नावाने सर्व स्तरावर परिचित आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ महानगरपालिकने सन-२००८ मध्ये पुंडलिकनगर येथील चौकामध्ये स्मृतीस्तंभ बांधला. ह्या ठिकाणी स्व.पुंडलिक राऊत यांचा अर्धाकृती पुतळा उभारून त्या चौकाचे मनपाने सुशोभिकरण देखील केले आहे. दि.१८ ऑगस्ट १९९० रोजी नागरीकांचे प्राण वाचवितांना स्व.पुंडलिक राऊत यांना हौतात्म्य आले होते. त्यांच्या शौर्यप्रित्यर्थ या परिसराला पुंडलिकनगर असे नाव देण्यात आले आहे. दि.१८ ऑगस्ट रोजी स्व.पुंडलिक राऊत यांची जयंती आणि पुण्यतिथी असते. या निमित्त पालिका प्रशासनातर्फे यापुढे दरवर्षी स्व.पुंडलिक राऊत यांच्या पुतळ्यास अभिवादन करून आदरांजली अर्पण करावी अशी पुंडलिकनगर परिसरातील नागरीकांची मागणी आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्त सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे,

**अनुमोदक:-**श्री.त्र्यंबक गणपत तुपे, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.राजगौरव हरिदास वानखेडे, श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे,

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुंडलिकनगर येथील स्व.पुंडलिक राऊत यांच्या अर्धाकृती पुतळ्यास त्यांच्या दि.१८ ऑगस्ट रोजी जयंती आणि पुण्यतिथी दिवशी दरवर्षी महानगरपालिकेतर्फे अभिवादन करून आदरांजली अर्पण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर दलित वस्ती लोकसंख्या असून त्या ठिकाणी विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत सिमेंट रोड तयार करणे. | र.रु.१ कोटी ५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे. | र.रु.५० लक्ष |
| | **एकूण** | **र.रु.२ कोटी** |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मिना रामदास गायके **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर मधील दलित वसाहतीमध्ये विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत सिमेंट रोड तयार करणे. | र.रु.१ कोटी ५० लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.९३, पुंडलिकनगर अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे. | र.रु.५० लक्ष |
| | **एकूण** | **र.रु.२ कोटी** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७५ प्रभागातील रहिवासी श्री.गणेश चव्हाण व श्री.सचिन मगरे हे तायक्वांदो या क्रिडा प्रकारात राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहेत. त्यांनी राष्ट्रीय स्तरावर खेळून अनेक पुरस्कार प्राप्त केलेले आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे त्यांना खेळाची किट (साहित्य) घेण्यासाठी प्रत्येकी र.रु.२५ हजार आर्थिक मदत करण्यात यावी.

तरी सदर खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर व त्यावरील स्तरावर खेळण्यासाठी प्रोत्साहन प्राप्त होण्यासाठी महानगरपालिकेमार्फत प्रति श्री.गणेश चव्हाण यांना रु.२५,०००/- व श्री.सचिन मगरे यांना रु.२५,०००/- आर्थिक मदत देणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.त्र्यंबक गणपत तुपे **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७५ प्रभागातील रहिवासी श्री.गणेश चव्हाण व श्री.सचिन मगरे या दोन्ही तायक्वांदो खेळाडूंना खेळाची किट (साहित्य) घेण्यासाठी प्रत्येकी र.रु.२५ हजार आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४, गजाननगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९४ अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.<br>SCR-ZONE-06 P.NO.24, Sr.No.23 (र.रु.०५ लक्ष) | १.वॉर्ड क्र.९४, भारतनगर मध्ये खडीकरण करणे. (र.रु.०५ लक्ष). |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-**श्री.त्र्यंबक गणपत तुपे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४, गजाननगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९४ अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे.<br>SCR-ZONE-06 P.NO.24, Sr.No.23 (र.रु.०५ लक्ष) | १.वॉर्ड क्र.९४, भारतनगर मध्ये खडीकरण करणे. (र.रु.०५ लक्ष). |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६३ व लगतच्या ४ ते ५ वॉर्डाच्या परिसरात गोर-गरीब नागरीकांना त्याचे सण, उत्सव व लग्न समारंभ साजरे करण्यासाठी मनपाचे कोणते ही मंगल कार्यालय नसल्याने गोर-गरीब नागरीकांना रस्त्यावर सर्व कार्यक्रम साजरे करावे लागते. ज्यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होतो व अनेक वेळा वादविवादाची परिस्थती निर्माण होत असते त्याचे पर्यावसन भांडणात सुध्दा झालेले आहे.

वॉर्ड क्र.६३ अविष्कार कॉलनी अंतर्गत बजरंग चौक रोड साईनगर औरंगाबाद येथे व्यापारी संकुलाच्या पाठीमागे मनपाची खुली जागा पडीक अवस्थेत असल्याने सदर ठिकाणी भव्य मंगल कार्यालय बांधल्यास गोर-गरीबांना सोईचे होईल व मनपास त्या माध्यमातून आर्थिक महसुल प्राप्त होईल.

करीता सदरील मंगल कार्याल बांधण्यास परवानगी होऊन सदरील कामात मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये रु.२ कोटीची तरतुद मंजुर करण्यात यावी. तसेच तेरणा शाळेशेजारी मनपाची अंदाजे २ एक्कर जागा पडीक असल्याने त्या ठिकाणी युवकासाठी खेळाचे मैदान विकसीत करण्यासाठी रु.१ कोटीची तरतुद करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख **अनुमोदक:-**श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६३, अविष्कार कॉलनी अंतर्गत बजरंग चौक रोड साईनगर औरंगाबाद येथे व्यापारी संकुलाच्या पाठीमागे मनपाची खुली जागा पडीक असल्याने सदर ठिकाणी मंगल कार्यालय बांधण्यास परवानगी होऊन सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये रु.२ कोटी तसेच तेरणा शाळेशेजारी मनपाची अंदाजे २ एक्कर जागा पडीक असल्याने त्या ठिकाणी युवकासाठी खेळाचे मैदान विकसीत करण्यासाठी रु.१ कोटीची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१. वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी नेहरुनगर भागामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे प्रस्तावित होते. परंतु सदर काम हे मा.आमदार यांच्या निधीतूनही प्रस्तावित आहे. करीता सदर काम हे याच वॉर्डातील निरंतर बाग सोसायटी ह्या मंजुर रेखांकन असलेल्या ठिकाणी करण्यात यावे.
२. वॉर्ड क्र.७९ न्यायनगर भागातील गिरीजादेवी सोसायटी येथील ओपन स्पेसला कंपाऊंड करण्याचे काम प्रस्तावित होते. सदर काम हे मा.सभापती यांच्या निधीतूनही प्रस्तावित असल्याने हे काम याच वॉर्डातील कल्पतरु हौ.सोसायटी ह्या मंजुर रेखांकन असलेल्या सोसायटी मध्ये करण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी नेहरुनगर भागामध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाऐवजी याच वॉर्डातील निरंतर बाग सोसायटी ह्या मंजुर रेखांकन असलेल्या सोसायटी मध्ये पेव्हर ब्लॉक बसविण्यास तसेच वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागातील गिरीजादेवी सोसायटी येथील ओपन स्पेसला कंपाऊंड करण्याचे कामाऐवजी याच वॉर्डातील कल्पतरु हौ.सोसायटी

ह्या मंजुर रेखांकन असलेल्या सोसायटी मधील ओपन स्पेसला कंपाऊंड बांधण्याच्या कामास व स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, “श्रीमती जानकी देवी जायसवाल ट्रस्ट” यांच्या मार्फत मनपाच्या शाळेमधील विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण देण्यासाठी तसेच शाळांच्या वेळा व्यतिरीक्त समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विविध शासकीय व्होकेशनल ट्रेनिंग, मनपा प्रकल्प विभाग, महिला व बाल कल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या तसेच अन्य शासकीय तांत्रिक प्रशिक्षण देण्याची परवानगी देण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे **अनुमोदक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, “श्रीमती जानकी देवी जायसवाल ट्रस्ट” यांच्या मार्फत मनपाच्या शाळेमधील विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण देण्यास तसेच शाळांच्या वेळा व्यतिरीक्त समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विविध शासकीय व्होकेशनल ट्रेनिंग, मनपा प्रकल्प विभाग, महिला व बाल कल्याण विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या तसेच अन्य शासकीय तांत्रिक प्रशिक्षण देण्याची परवानगी देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ६३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा मधील एकतानगर (स्लम) व नाथनगर (वैतागवाडी) या वसाहतींमध्ये ५०% पेक्षा जास्त दलित लोकसंख्या आहे. सदर भागात मुलभूत नागरी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या “दलित वस्ती सुधार योजने” अंतर्गत

१. विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. रु.५० लक्ष,
२. विविध ठिकाणी पथदिवे लावणे. रु.२५ लक्ष,
३. विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. रु.२५ लक्ष,
४. विविध ठिकाणी पाणी पुरवठ्याची पाईप लाईन टाकणे. रु.५० लक्ष

उपरोक्त कामे करण्यासाठी एकूण र.रु.१.५० कोटीचा निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे कार्यालयाकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०७, ईटखेडा मधील एकतानगर (स्लम) व नाथनगर (वैतागवाडी) या वसाहतींमध्ये खालील विकास कामे करण्यासाठी शासनाच्या “दलित वस्ती सुधार योजने” अंतर्गत निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

१. विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. रु.५० लक्ष,
२. विविध ठिकाणी पथदिवे लावणे. रु.२५ लक्ष,
३. विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. रु.२५ लक्ष,
४. विविध ठिकाणी पाणी पुरवठ्याची पाईप लाईन टाकणे. रु.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

(मा.आयुक्त सभागृहाच्या बाहेर निघुन जातात.)

श्री.प्रमोद राठोड :सर्व विषय आयुक्तांच्या सहिने विषय यावे.

मा.महापौर :मा.आयुक्ताच्या सहिने या सभेस विषय यावेत.

श्रीमती नरगीस शेख :माझे वार्डातील ३ व ६ वर्षाच्या मुलाला मोकाट कुत्र्याने चावा घेतला कार्यवाही करीत नाही.

श्री.अजीम अहेमद :यापुर्वी रहेमानिया कॉलनी कटकट गेट भागात कुत्र्याने अनेकांचा चावा घेतला.

श्री.जमीर कादरी :घाटीमध्ये इंजेक्शन मिळत नाही.

मा.महापौर :घाटीत पहिले इंजेक्शन दिले जाते नंतर महापालिकेकडे देतो तर महापालिकेने व्यवस्था करावी. मोकाट कुत्रे पकडण्याची कार्यवाही करावी. त्या मुलांच्या कुटूंबीयांना काय जी मदत लागेल ती करावी.

श्री.राजू शिंदे :मा.आयुक्त साहेब येथे नाही. समांतरची बैठक आता घेऊ नये.

या वेळी अनेक सदस्य समांतर जलवाहिनी विषया संदर्भात नंतर सभा घ्यावी मागणी करतात.

मा.महापौर :सदस्यांची मागणी विचारात घेता व मा.आयुक्त आता सभेला उपस्थित नसल्याने समांतर जलवाहिनी पुनरूजीवन करण्याचा विषय आहे त्यासाठी १७ ऑगस्ट २०१८ रोजी सभा घेतली जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :दोन दिवसाआड पाणी सिडको-हडको भागात देणार होते.कार्यवाही झाली नाही.

श्री.भगवान घडमोडे :पाणी येण्याची वेळ निश्चित नाही. सभागृहाने निर्णय घेतला असे असतांना सुध्दा पाणी वेळेवर येत नाही.

कार्य.अभियंता :दोन दिवसा आड ६०-७० टक्के भागात पाणी चालू आहे. काही भागातच तीन व चार दिवसा आड पाणी येत आहे.तिन दिवसाआड पाणी पुरवठा देऊ शकतो.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी वेळेवर पाणी सोडण्याची कार्यवाही करावी. सर्व भागात पाणी मिळेल नियोजन करावे. ६-६ दिवसाआड पाणी येत आहे हे योग्य नसून आवश्य ते नियोजन करावे शहराला तीन दिवसाआड पाणी देण्याची कार्यवाही करावी.

या बरोबर सभा राष्ट्रगीताने संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |